cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६४ | रविवार दि.२४ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बेरोजगारी, असंतोष आणि 'झूरळा' ची चाहूल!

देशाच्या लोकशाही व्यवस्थेत कधी कधी एखादा शब्द, एखादी उपमा किंवा एखादे वक्तव्य हे केवळ भाष्य राहत नाही; ते जनभावनांचे प्रतीक बनते. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांना 'झुरळा'ची दिलेली उपमा आणि त्यातून जन्माला आलेली 'कॉक्रोच जनता पार्टी' अर्थात सीजेपी ही संकल्पना, याकडेही याच दृष्टिकोनातून पाहावे लागेल. वरकरणी ही घटना सोशल मीडियावरील विडंबन वा उपहास वाटत असली, तरी तिच्यामागे दडलेली अस्वस्थता,

# शेतकऱ्यांचा २७ मे पासून एल्गार

## हमीभाव आदेशाच्या प्रतींची होळी, संयुक्त किसान मोर्चाकडून आंदोलन

दिल्ली । वृत्तसंस्था

**सध्या शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. शेतपिकांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी हमीभाव, त्यात आता खते आणि डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे तो मेटाकुटीला आला आहे. या प्रश्नी संयुक्त किसान मोर्चाने २७ मे पासून देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. यावेळी हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचे संकेत शेतकरी नेत्यांनी दिले आहेत.**




या आंदोलनादरम्यान शेतकरी संघटना आणि शेतमजुरांना केंद्राच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) आदेशाच्या आणि २०२६–२७ खरीप हंगामासाठी कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या (सीएसीपी) अहवालाच्या प्रतींचे दहन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कृषी मूल्य आयोग हे कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेले तज्ज्ञ सल्लागार मंडळ असून, त्यांच्यावर खरीप आणि रब्बी हंगामातील अधिसूचित पिकांची किमान आधारभूत किंमत निश्चित करुन त्याबाबत शिफारशी करण्याची जबाबदारी आहे. एसकेएमने केंद्र सरकारचे हमीभाव धोरण फसवे असल्याचा आरोप केला आहे. इंधन दरवाढ करुन शेतकऱ्यांवर अतिरिक्त भार टाकला आहे. तसेच सरकारला खत टंचाईची परिस्थिती योग्य प्रकारे हाताळता आली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी खते आणि डिझेलच्या वाढत्या दरांविरोधात आंदोलनाची हाक त्यांनी दिली आहे. तसेच खतांचा काळाबाजार सुरुच असून, त्यावर कोणतीही कारवाई केली जात नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. सरकारचे सध्याचे हमीभाव धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नाही. शेतीचा उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतपिकांना योग्य भाव मिळत नाही. त्यांच्या मते, २०२६–२७ च्या खरीप हंगामासाठी

▶▶ पान २ वर

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

किमान आधारभूत किमतीला कायदेशीर हमी द्या. डिझेल आणि इंधनाच्या वाढत्या दरापासून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा. खतांच्या उपलब्धतेची खात्री मिळावी.



## मॉन्सूनची जोरदार आगेकूच

पुणे । प्रतिनिधी

**नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनने शनिवारी नैऋत्य अरबी समुद्राच्या काही भागात, आग्नेय अरबी समुद्राच्या आणखी काही भागात, कोमोरिन परिसरात तसेच नैऋत्य, आग्नेय आणि पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरात आणि अंदमान समुद्राच्या बहुतांश भागात पुढे प्रगती केल्याचे हवामानशास्त्र विभागाने जाहीर केले आहे. पुढील तीन ते चार दिवसांत मॉन्सूनचे वारे नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्राच्या आणखी काही भागात, कोमोरिन परिसरात, तसेच नैऋत्य, आग्नेय व पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरात आणि अंदमान समुद्राच्या उर्वरित भागात आणखी प्रगती करण्यासाठी पोषक स्थिती असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.**

विदर्भात उष्णतेच्या लाटेने अंगाची लाही होत आहे. उष्ण लाटेमुळे होरपळ वाढली असून रात्री उष्ण आणि दमट हवामान होत आहे. अनेक ठिकाणी उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामानाचा

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### जागतीक परिषदेची बोलणी फिसकटली

न्यूयॉर्कः जागतिक सुरक्षा आणि अण्वस्त्रांच्या शर्यतीला लगाम घालण्याच्या उद्देशाने न्यूयॉर्कमध्ये आयोजित करण्यात आलेली संयुक्त राष्ट्रांची अत्यंत महत्त्वाची बैठक पुन्हा एकदा निष्फळ ठरली आहे. अण्वस्त्र प्रसारबंदी कराराच्या आढावा बैठकीची तिसरी फेरी कोणत्याही अंतिम कराराशिवाय संपुष्टात आली असून, यामुळे जागतिक राजकारणात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. या अपयशानंतर इराणने आक्रमक पवित्रा घेत अमेरिका आणि तिच्या पाश्चात्त्य मित्र राष्ट्रांवर या जागतिक परिषदेत मुद्दाम 'अडथळा आणल्याचा' गंभीर आरोप केला आहे. अमेरिकेच्या वाढत्या दबावामुळे आणि अवास्तव मागण्यांमुळेच हा जागतिक शांततेचा प्रयत्न सलग तिसऱ्यांदा अपयशी ठरल्याचे इराणने उघडपणे म्हटले आहे.

### ममता बॅनर्जींनी बांधलेला तो पुतळा भाजपने पाडला

कोलकाताः धडापासून दोन पाय कापलेले आणि त्यावर फुटबॉल असलेले एक वादग्रस्त शिल्प, कोलकाता येथील प्रतिष्ठित सॉल्ट लेक स्टेडियमची ओळख बनले होते. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी स्वतः डिझाइन केलेल्या या शिल्पाने लोकांमध्ये मतभेद निर्माण केले होते, अनेकांनी याला डोळ्यांना खुपणारे आणि अगदी विद्रूप म्हटले होते. मंत्री निसिथ प्रमाणिक यांनी ते हटवण्याचे वचन दिल्यानंतर काही दिवसांनी, अखेरीस शनिवारी भाजपा सरकारने हे शिल्प पाडले. शनिवारी सकाळी, सॉल्ट लेक स्टेडियमच्या व्हीव्हीआयपी गेटजवळून हे शिल्प हटवलेले पाहून स्थानिकांना आश्चर्य वाटले. याच स्टेडियममध्ये नुकतेच फुटबॉल दिग्गज लिओनेल मेस्सी आले होते.

### संजय शिरसाट यांची शिंदेंकडून कानउघाडणी

मुंबईः शिवसेना प्रवक्ते आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार आणि नेते शिवसेनेच्या संपर्कात असल्याचे वक्तव्य केले होते. या वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिरसाट यांची कानउघाडणी करत त्यांना महायुतीतील पक्षांबाबत बोलताना जपून बोलण्याचा सल्ला दिला. राष्ट्रवादीतून बाहेर जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. राष्ट्रवादीचे काही लोक निश्चितच आमच्या संपर्कात आहेत. पक्षात कोणत्या नेतृत्वाखाली काम करायचे, हा प्रश्न अनेकांना पडला आहे. राष्ट्रवादीत काय घडतेय, हे लवकरच कळेल; पण राष्ट्रवादीत सारे काही आलबेल नाही, एवढे मात्र नक्की, असे वक्तव्य शिरसाट यांनी केले होते. निमित्त होते राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केल्याचे.

# देशातील ४० टक्के वकील बनावट

### बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्षांचा खळबळजनक दावा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील सुमारे ३५ ते ४० टक्के वकीलांच्या पदव्या बनावट आहेत. ते या खोट्या प्रमाणपत्रांच्या जोडीवर न्यायालयांमध्ये वकिली करत आहेत, असा खळबळजनक दावा बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील मनन कुमार मिश्रा यांनी केला. बनावट पदव्या असणाऱ्या वकिलांमुळे निर्माण झालेल्या समस्येची बीसीआयला या समस्येची पूर्ण जाणीव असून, यावर आवश्यक पावले उचलण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




बीसीआयचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा म्हणाले, "न्यायालयीन परिसरात काळे कोट आणि बँड घालून फिरणारे सुमारे ३५ ते ४० टक्के लोक हे बनावट आहेत, त्यांच्या पदव्या पूर्णपणे खोट्या आहेत, याची पूर्ण कल्पना बार कौन्सिल ऑफ इंडियाला आहे. त्यांनी वकिलीच्या पदव्या कुठेतरी तयार केल्या आहेत किंवा विकत घेतल्या आहेत आणि त्याच बळावर ते न्यायालयात प्रॅक्टिस करत आहेत." जेव्हा बीसीआयने वकीलांच्या पदव्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरू केली, तेव्हा सुमारे

▶▶ पान २ वर

# राज्यसभेसाठी भुजबळांचा पत्ता कट?

## राष्ट्रवादीत हाचलाची सुरू, 'या' चार नावांची चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील रिक्त राज्यसभा जागांवरून महायुतीमध्ये मोठ्या राजकीय हालचाली सुरू झाल्या असून, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत समीकरणं वेगाने बदलताना दिसत आहेत. विशेष म्हणजे, पक्षात आता पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांचे वाढते वर्चस्व स्पष्टपणे जाणवत असून, राज्यसभेच्या एका जागेसाठी नव्या चेहऱ्यांची चर्चा रंगली आहे.**





बारामती पोटनिवडणुकीनंतर सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

▶▶ पान २ वर

### पार्थ पवारांचा तरुण नेतृत्वाला पाठिंबा

राष्ट्रवादी फुटीनंतर पक्ष संघटना पुन्हा उभी करण्यामध्ये पार्थ पवार यांची भूमिका वाढली असल्याचे बोलले जात आहे. दिल्ली पातळीवरील संपर्क, संघटनात्मक समन्वय आणि तरुण नेतृत्वाला पुढे आणण्याच्या रणनीतीमुळे पार्थ पवारांचा प्रभाव वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



### अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी घेतली पीएम मोदींची भेट


नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारत दौऱ्यावर आलेले अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या उभय नेत्यांमध्ये सुमारे एक तास धोरणात्मक चर्चा चालली. या महत्त्वपूर्ण बैठकीदरम्यान मार्को रुबियो यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वतीने पंतप्रधान मोदी यांना वॉशिंग्टिन येथील

▶▶ पान २ वर

# इलेक्ट्रिक वाहनांची आता चलती

## ● सरकार देणार प्रोत्साहन, व्याजदर होणार कमी!



मुंबई । वृत्तसंस्था

इलेक्ट्रिक वाहन खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी या गाड्यांवर देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज कमी होण्याची शक्यता आहे. इलेक्ट्रिक बस आणि ट्रक खरेदी करण्यासाठी देखील सर्व बँकांना कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. अवजड उद्योग मंत्रालयाच्या वतीने सरकारी आणि खासगी दोन्ही बँकांना इलेक्ट्रिक बस आणि ट्रक खरेदीशी संबंधित कर्जाबबात बैठक बोलवण्यात आली होती. इलेक्ट्रिक बस आणि ट्रक खरेदीला चालना देण्यासाठी सरकार व्याजदरात तीन ते पाच टक्क्यांची सूट देऊ शकते. याचा बोजा सरकार उचलणार आहे.

▶▶ पान २ वर

### सोलार पॅनलसाठी देखील कमी व्याजदर

घरावर सोलर पॅनल लावण्यासाठी कमी व्याजदरावर जास्तीजास्त कर्ज देण्यास बँकांना सांगण्यात आले आहे. अजूनही सामन्य लोकांना घरावर सोलर पॅनल लावण्यासाठी बँकांकडून कर्ज मिळते ही बाब माहिती नाही. सोलन पॅनल लावण्यासाठी काही बँका फक्त ६.५ टक्के व्याजदराने कर्ज देत आहेत.

# एकल महिला धोरणासाठी मसुदा समिती गठीत–मेघना बोर्डीकर

मुंबई । प्रतिनिधी

### विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत आणि अविवाहीत महिलासांठीचे धोरण

राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व कायदेविषयक प्रश्नांचा सर्वंकष विचार करून त्यांना विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा यासाठी एकल महिला धोरण तयार करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले.



राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर म्हणाल्या, राज्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित तसेच एकट्याने संसाराचा भार सांभाळणाऱ्या महिलांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. यासाठी महिला व बाल विकास

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६४.५० क्विंटल | २,०७० | ६,६०० | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड : ६७.०० क्विंटल | १,९०१ | ३,२३५ | २,३८६ |
| मका/लोकल: ६.५० क्विंटल | १,९२२ | १,९२२ | १,९२२ |
| तूर : -- क्विंटल | -- | -- | -- |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: २६.५० क्विंटल | २,३२५ | ३,६१० | २,७६४ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:-- क्विंटल | -- | -- | -- |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,६४१ | ५,६४१ | ५,६४१ |

# पेट्रोल-डिझेलचा तुटवडा; युद्धाचा परिणाम की तिजोरीत खडखडाट

## एकीकडे इंधनाची टंचाई तर दुसरीकडे जनेतमध्ये संभ्रमावस्था

मुंबई– बीड । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा गंभीर तुटवडा जाणवू लागला आहे. ग्रामीण भागासह शहरी भागांतील पेट्रोल पंपांवर नो स्टॉकचे फलक झळकत असून, इंधनासाठी नागरिकांच्या आणि वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र आहे. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेल मिळत नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून, राज्यात इंधनाचा हा तुटवडा नेमका कशामुळे आहेपश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे की राज्यावरील आर्थिक संकटामुळेअशी चर्चा आता सर्वसामान्यांमध्ये रंगली आहे.**



आंतरराष्ट्रीय बाजारात पश्चिम आशियातील (विशेषतः इराण आणि अमेरिका–इस्रायलमधील) वाढत्या तणावामुळे आणि होर्मुज खाडीतील विस्कळीत पुरवठा साखळीमुळे कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. भारतातही गेल्या १० दिवसांत तिसऱ्यांदा पेट्रोल–डिझेलच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे भविष्यात इंधनाचा पुरवठा पूर्णपणे ठप्प होईल अशी एक भीती आणि अफवा नागरिकांमध्ये पसरली. परिणामी, राज्यभरात पॅनिक बाइंग (भीतीपोटी अतिरिक्त खरेदी) सुरू झाली. अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात राज्यात पेट्रोलच्या विक्रीत २०.३९% आणि डिझेलच्या विक्रीत १९.६६% ची प्रचंड वाढ झाली आहे. १९ मे रोजी तर एकाच दिवसात डिझेलची मागणी सरासरीपेक्षा ४२ टक्क्यांनी वाढली. विरोधी पक्ष आणि सर्वसामान्यांकडून राज्य सरकारच्या आर्थिक

▶▶ पान २ वर

### कोणत्या जिल्ह्यांना सर्वाधिक फटका?

राज्यातील बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, परभणी, वाशीम, अकोला, बुलढाणा, हिंगोली आणि जळगाव या ११ जिल्ह्यांमध्ये इंधनाची मागणी अचानक वाढल्याने टंचाई तीव्र झाली आहे. अकोल्यात डिझेलची मागणी चक्क १११% तर वाशीममध्ये १०९% वाढली आहे. मागणी आणि पुरवठ्यातील या अचानक झालेल्या बदलामुळे अनेक पंप रिकामे झाले आहेत.

### शेतकऱ्यांना ७/१२ ची सक्ती

ऐन शेती मशागतीच्या वेळेस डिझेल टंचाई निर्माण झाल्याने परभणी आणि हिंगोली सारख्या जिल्ह्यांमध्ये प्रशासनाने डिझेल वितरणावर निर्बंध आणले आहेत. ट्रॅक्टरसाठी डिझेल हवे असल्यास चक्क ७/१२ उतारा, आधार कार्ड आणि आरसी बुक दाखवण्याची जाचक अट घालण्यात आली आहे. यामुळे शेतकरी आणि ट्रॅक्टर चालकांमध्ये प्रचंड संताप असून, प्रशासनाच्या या निर्णयावर तीव्र टीका होत आहे.




cmyk

## अग्रलेख

# बेरोजगारी, असंतोष आणि ‘झूरळा’ ची चाहूल!

देशाच्या लोकशाही व्यवस्थेत कधी कधी एखादा शब्द, एखादी उपमा किंवा एखादे वक्तव्य हे केवळ भाष्य राहत नाही; ते जनभावनांचे प्रतीक बनते. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांना ‘झुरळा’ची दिलेली उपमा आणि त्यातून जन्माला आलेली ‘कॉक्रोच जनता पार्टी’ अर्थात सीजेपी ही संकल्पना, याकडेही याच दृष्टिकोनातून पाहावे लागेल. वरकरणी ही घटना सोशल मीडियावरील विडंबन वा उपहास वाटत असली, तरी तिच्यामागे दडलेली अस्वस्थता, संताप आणि निराशा ही देशाच्या वर्तमान सामाजिक–आर्थिक वास्तवाचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे सीजेपी ही केवळ इंटरनेटवरील ट्रेंड नसून, व्यवस्थेविरोधात साचत गेलेल्या भावनांचा एक डिजिटल उद्रेक म्हणावा लागेल.

आज देशात बेरोजगारीचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूप धारण करीत आहे. उच्चशिक्षित तरुण नोकरीसाठी वणवण भटकत आहेत. सरकारी भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडलेल्या आहेत. त्यातच पेपरफुटी, भ्रष्टाचार आणि भरतीतील गैरव्यवहारांमुळे तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वास ढासळत चालला आहे. दुसरीकडे महागाई, इंधन तुटवडा, वाढते आर्थिक असमानतेचे चित्र आणि सामान्य नागरिकांच्या जीवनमानावर आलेले संकट यामुळे जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. अशा काळात सत्ताधाऱ्यांकडून वास्तव समजून घेण्याऐवजी ‘सगळे काही सुरळीत आहे’ असे चित्र रंगवले जाते, तेव्हा तरुणांच्या मनात दडपून ठेवलेला रोष सोशल मीडियाच्या माध्यमातून बाहेर पडतो. सीजेपीचा उदय हा त्याचाच परिणाम आहे. विशेष म्हणजे, ही चळवळ कोणत्याही मोठ्या राजकीय घराण्यातून किंवा संघटनात्मक पार्श्वभूमीतून आलेली नाही. अमेरिकेतील बोस्टनमध्ये राहणाऱ्या अभिजित दीपके या युवकाने सुरू केलेल्या या संकल्पनेने काही दिवसांत हजारो तरुणांना आकर्षित केले. यामागे केवळ विनोद किंवा ट्रोल संस्कृती नाही; तर व्यवस्थेविषयीचा वाढता अविश्वास आहे. सध्याच्या पिढीचा मोठा वर्ग पारंपरिक राजकारणापासून दुरावत चालला आहे. त्यांना सत्ताधारी पक्षांवर विश्वास नाही, पण विरोधकांवरही फारसा भरोसा उरलेला नाही. त्यामुळे सोशल मीडियावरून उभ्या राहणाऱ्या पर्यायी व्यासपीठांकडे ते आशेने पाहू लागले आहेत. भारतीय राजकारणाच्या इतिहासात अशा चळवळी नवीन नाहीत. स्वातंत्र्य आंदोलनापासून ते जेपी आंदोलन, अण्णा हजारे चळवळ, शेतकरी आंदोलने किंवा विविध प्रादेशिक अस्मितांच्या चळवळी प्रत्येक आंदोलनाचा उगम हा व्यवस्थेविषयीच्या असंतोषातूनच झाला. ‘आम आदमी पार्टी’ हे त्याचे अलीकडचे आणि महत्त्वाचे उदाहरण ठरते. भ्रष्टाचारविरोधी अण्णा आंदोलनातून निर्माण झालेल्या असंतोषाला ‘आप’ने राजकीय रूप दिले आणि दिल्लीसारख्या महत्त्वाच्या राज्यात सत्ता मिळवली. मात्र, देशपातळीवर मजबूत संघटन, वैचारिक स्पष्टता आणि दीर्घकालीन नेतृत्वाचा अभाव यामुळे त्या पक्षाचा विस्तार मर्यादित राहिला. काँग्रेसविरोधी भावना निर्माण करण्यात ‘आप’चा वाटा असला, तरी त्याचा सर्वाधिक राजकीय लाभ भाजपला झाला. त्यामुळे सोशल मीडियावरील लोकप्रियता आणि प्रत्यक्ष राजकीय यश यामध्ये किती मोठी दरी असते, हे इतिहासाने दाखवून दिले आहे. सीजेपीबाबतही हेच वास्तव लागू पडते. सोशल मीडिया हँडल चालवणे आणि प्रत्यक्ष चळवळ उभी करणे यात प्रचंड फरक आहे. एखादा हॅशटॅग ट्रेंड होऊ शकतो, काही दिवसांपुरता उत्साह दिसू शकतो; पण त्याला संघटनात्मक रूप देण्यासाठी वैचारिक दिशा, सातत्यपूर्ण कार्यक्रम, नेतृत्व क्षमता आणि व्यापक सामाजिक स्वीकार आवश्यक असतो. बेरोजगारी, पेपरफुटी, आर्थिक संकट यांसारख्या प्रश्नांनी त्रस्त तरुणांना एकत्र आणणे शक्य असले, तरी त्यांना दीर्घकालीन राजकीय चळवळीत रूपांतरित करणे सोपे नाही. अन्यथा अनेक इंटरनेट ट्रेंडप्रमाणे ही चळवळही काही दिवसांत विरून जाण्याचा धोका नाकारता येत नाही. तरीसुद्धा, सीजेपीसारख्या संकल्पनेने सत्ताधाऱ्यांची अस्वस्थता वाढणे हेच तिचे महत्त्व अधोरेखित करते. जर ही केवळ क्षणिक खिल्ली असती, तर तिच्या सोशल मीडिया खात्यांवर कारवाई करण्याची गरज भासली नसती. उलट, यावरूनच सत्ताधाऱ्यांना जनतेतील नाराजीची जाणीव असल्याचे दिसून येते. विशेषतः तरुण वर्गामध्ये निर्माण होत असलेली निराशा ही भविष्यातील राजकारणासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. भारतातील सध्याचे राजकारण पाहता भाजप हा अतिशय बलवान पक्ष बनला आहे. अनेक प्रादेशिक पक्ष अस्तित्व टिकवण्यासाठी झगडत आहेत, तर काँग्रेस अद्याप सक्षम पर्याय उभा करण्यात अपयशी ठरत आहे. अशा परिस्थितीत कोणतीही नवी चळवळ उदयास आली, तरी ती सुरुवातीला सत्ताधाऱ्यांपेक्षा विरोधकांसाठी अधिक धोकादायक ठरू शकते. यातील दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे विरोधकांचे अपयश. लोकांच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस भूमिका घेऊन संघर्ष उभारण्याऐवजी विरोधक अनेकदा केवळ आरोप–प्रत्यारोपांच्या राजकारणात अडकलेले दिसतात. बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, शेती, महागाई यांसारख्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून व्यापक जनआंदोलन उभे करण्यात विरोधक कमी पडत आहेत. परिणामी, निराश झालेला तरुण वर्ग पर्यायी आवाज शोधू लागतो. सीजेपीसारख्या चळवळी त्या रिकाम्या जागेत जन्म घेतात. ही परिस्थिती लोकशाहीसाठी धोकादायकही ठरू शकते, कारण जेव्हा पारंपरिक राजकीय पक्ष लोकांच्या भावना समजून घेण्यात अपयशी ठरतात, तेव्हा असंतोष अनियंत्रित दिशेने वाहू लागतो. अर्थात, सीजेपी खरोखर उद्या राजकीय पक्षात रूपांतरित होईल का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. त्यासाठी केवळ सोशल मीडिया लोकप्रियता पुरेशी ठरणार नाही. देशाच्या विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवाचा अभ्यास, संघटन उभारणी, स्पष्ट धोरणे आणि नेतृत्वाची विश्वासार्हता या कसोट्यांवर उतरावे लागेल. मात्र, या चळवळीने निर्माण केलेला संदेश अत्यंत स्पष्ट आहे देशातील एक मोठा वर्ग स्वतःला उपेक्षित, असुरक्षित आणि व्यवस्थेपासून तुटलेला समजू लागला आहे. लोकशाहीत अशा चळवळी अचानक निर्माण होत नाहीत. त्या व्यवस्थेतील पोकळ्या, जनतेच्या वेदना आणि राजकीय अपयश यांच्याच पोटी जन्म घेतात. त्यामुळे सीजेपीचे भविष्य काहीही असो, तिचा उदय हा सत्ताधारी आणि विरोधक या दोघांसाठीही गंभीर इशारा मानावा लागेल. कारण लोकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, तर उपहासातून सुरू झालेली चळवळ कधी वास्तवातील राजकीय आव्हान बनेल, हे सांगता येत नाही.

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नांना मोठे यश; आष्टी तालुक्याला मिळणार अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्याला ‘जीवनदायिनी’ भेट; गोरगरीबांसाठी मोठा दिलासा

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील गोरगरीब, उसतोड मजूर, शेतकरी कुटुंबे आणि अपघातग्रस्त रुग्णांसाठी मोठा दिलासा देणारी महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली असून, लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नांतून तालुक्याला अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वाढती लोकसंख्या, अपघातांच्या घटना आणि ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा लक्षात घेता ही मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. अखेर या मागणीला यश मिळाल्याने तालुक्यात समाधान व्यक्त होत आहे.**



शुक्रवार दिनांक २२ मे २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयात आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित पत्रकार परिषदेत ही महत्त्वपूर्ण माहिती समोर आली. यावेळी समाजसेवक समीर शेख यांनी आष्टी तालुक्यातील गंभीर परिस्थिती मांडत अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली. समीर शेख यांनी सांगितले की, सध्या संपूर्ण आष्टी तालुक्यासाठी फक्त एकच १०८ रुग्णवाहिका कार्यरत आहे. त्यामुळे अनेकदा गर्भवती महिलांना वेळेवर उपचारासाठी रुग्णालयात पोहोचवणे कठीण होते, तर अपघातग्रस्तांना मदत मिळण्यास विलंब होऊन जीवितहानीची शक्यता निर्माण होते. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत असल्याने खासगी वाहनांचा खर्च परवडत नाही. त्यामुळे अतिरिक्त रुग्णवाहिका ही तालुक्याची अत्यंत गरजेची मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समीर शेख यांनी आतापर्यंत स्वतःच्या पुढाकारातून ४८ अपघातग्रस्तांना मदत केली असून, १५ गरीब शेतकरी कुटुंबातील महिलांना प्रसूतीसाठी वेळेत दवाखान्यात पोहोचवण्याचे काम केले आहे. मात्र केवळ एका रुग्णवाहिकेमुळे अनेक वेळा प्रशासनावर ताण निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या मागणीची गंभीर दखल घेत आमदार सुरेश धस यांनी तत्काळ सकारात्मक भूमिका घेतली. तसेच ओमप्रकाश शेटे यांनीही ही मागणी मान्य करत अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका मंजुरीसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्याला ही रुग्णवाहिका भेट स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. राजकीय वर्तुळातही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू असून, ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून आमदार सुरेश धस यांची प्रतिमा आणखी मजबूत झाल्याची भावना कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. आगामी काळात तालुक्यातील आरोग्य सुविधांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

### ‘रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा’

समाजसेवक समीर शेख म्हणाले, ‘‘आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून तालुक्यातील गोरगरीब जनतेचा हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. अनेक वेळा रुग्णवाहिका वेळेत उपलब्ध न झाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण होते. आता अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका मिळाल्यानंतर हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल.’’ आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सर्वप्रथम १०८ वर संपर्क साधावा. रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यास समाजसेवक समीर शेख यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे. केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे: एम.डी. सायकिअॅट्री एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. नागपूर येथे एम.डी. सायकिअॅट्रीला सुरुवात प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

# लग्नातील आतिषबाजीने आग लागून फोटोग्राफर गंभीर जखमी

## संबंधीतावर कारवाई करण्यासाठी फोटोग्राफर संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

**शहरातील बार्शी रोड परिसरात एका विवाह सोहळ्या दरम्यान लग्नातील आतिषबाजीमुळे गंभीर दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत एका फोटोग्राफरला गंभीर दुखापत झाली असून त्याचे लाखो रुपयांचे व्यावसायिक साहित्य देखील घटनेत जळून खाक झाले. याप्रकरणी संबंधित लग्नसोहळ्याचा इव्हेंट आयोजक आणि फटाके व्यवस्थापन करणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी फोटोग्राफर असोसिएशनकडून करण्यात आली आहे. दरम्यान, मागील महिन्यात घडलेल्या या घटनेचे व्हिडिओ आता समोर आला आहे. तर, फोटोग्राफर असोसिएशनने जिल्हाधिकारी महोदयांची भेट घेऊन त्यांना निवेदनही दिले.**

बीड शहरातील आशीर्वाद मंगल कार्यालयात २८ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या विवाह सोहळ्या दरम्यान मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. ही फटाकेबाजी आवश्यक सुरक्षा उपाय व नियमांचे पालन न करता करण्यात आल्याचा आरोप जखमी तरुणाच्या कुटुंबाने केला. घटनेत फोटोग्राफर अभिषेक कदम हा गंभीररीत्या भाजला असून त्याच्यावर सध्या छत्रपती संभाजीनगर येथे उपचारही करण्यात आले आहेत. मात्र, या दुर्घटनेमुळे मंगलकार्यालयात होणाऱ्या आतिषबाजीच्या सुरक्षेचा मुद्दा प्रामुख्याने समोर आला आहे. लग्नकार्यात फटाके उडवताना, किंवा आतिषबाजी करताना, या सोहळ्यातील उपस्थित नागरिकांच्या जीवाला धोका होईल किंवा दुखापत होईल असे कुठलेही कृत्य होता कामा नये, त्यासाठी काही नियमावली आखून दिली पाहिजे. तसेच, संबंधित दारुगोळा वा फटाक्यांची आतिषबाजी करताना त्या फटाक्यांचा दर्जाही पाहायला हवा, जेणेकरुन अपघात होणार नाही. दरम्यान, फोटोग्राफर्स असोसिएशनच्या टीमने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत यातील दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. या घटनेतून सावरल्यानंतर याबाबत कुटुंबाने तक्रार दिली आहे. त्यामुळेच, आज फोटोग्राफर असोसिएशननेही याबाबत कारवाईची मागणी केली.

## पान १ वरून...

### मॉन्सूनची जोरदार आगेकूच

इशारा देण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाने हजेरी लावली आहे. तसेच काही जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, विदर्भातील अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात उष्णतेचा रेड अलर्ट म्हणजेच सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच या दोन जिल्ह्यात रात्री उष्ण व दमट हवामानाचा अंदाज आहे. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तर बीड, परभणी, नांदेड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी हजेरी लावतील. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असून, नाशिक जिल्ह्यात हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला असून उर्वरित राज्यात कोरड्या हवामानासह उन्हाचा चटका कायम राहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे.

------------

### शेतकऱ्यांचा २७ मे

जाहीर केलेला पिकांचा हमीभाव हा प्रत्यक्ष उत्पादन खर्चापेक्षा खूप कमी आहे. कृषी मूल्य आयोगाकडून दरवर्षी शेतपिकांचे हमीभाव निश्चित करण्यासाठी शिफारशी केल्या जातात. पण, यात शेतकऱ्यांना प्रत्यक्षात येणारा उत्पादन खर्च आणि अपेक्षित नफा यांचा पुरेसा विचार केला जात नाही. त्यात डिझेल, बियाणे, खते आणि मजुरीचा खर्च सातत्याने वाढत असताना, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसल्याचे शेतकरी संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे. पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरात वाढ झाल्यामुळे शेतीचा खर्चही वाढला आहे. शेतजमीन नांगरणीपासून ते शेतमाल बाजारात पाठवण्यापर्यंत खर्च वाढला आहे. याचा सर्वाधिक फटका अल्पूधारक आणि मध्यम शेतकऱ्यांना बसत असल्याचे एसकेएमने म्हटले आहे. संयुक्त किसान मोर्चाने २०२१–२२ दरम्यान दिल्ली सीमेवर मोठे आंदोलन केले होते. आता पुन्हा एकदा ही संघटना सरकारविरोधात मोठ्या आंदोलनाची तयारी करत आहे. त्यांच्या मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकरी नेत्यांनी दिला आहे.

------------

### राज्यसभेसाठी भुजबळांचा

त्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून, कोणाला संधी मिळणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे राज्यसभेसाठी इच्छुक असल्याची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होती. मात्र, पक्षश्रेष्ठींनी त्यांना राज्यातील राजकारणातच सक्रिय ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. आगामी विधानसभा निवडणुका आणि संघटनात्मक जबाबदाऱ्या लक्षात घेता भुजबळांना दिल्लीऐवजी महाराष्ट्रातच भूमिका दिली जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभुमीवर सध्या राष्ट्रवादीच्या गोटात काही नव्या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामध्ये सुबोध मोहिते, अविनाश आदिक, प्रमोद हिंदुराव, संजय काकडे या नावांचा समावेश असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, या सर्व नेत्यांना पार्थ पवारांच्या निकटवर्तीयांमध्ये गणले जात असल्याने पक्षात नव्या नेतृत्वाला प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र दिसत आहे.

---------------

### देशातील ४० टक्के वकील

४०% वकिलांनी पडताळणीचे अर्ज भरले नाहीत. त्यामुळे हे ४०% वकील बनावट असण्याचा संशय आहे. ही बाब आपण भारताच्या सरन्यायाधीशांच्याही निदर्शनास आणून दिली असल्याचे मनन कुमार मिश्रा यांनी सांगितले. भारताच्या सरन्यायाधीशांनी न्यायालयात केलेल्या एका तोंडी टिप्पणीनंतर सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टी ही मोहीम सुरू झाली होती. या मोहिमेबाबत आपले मत मांडताना मिश्रा म्हणाले की, सरन्यायाधीश त्या तरुणांबद्दल बोलत होते जे बनावट पदव्या घेऊन या व्यवसायात येतात. बनावट पदव्या मिळवून, काळा कोट, बँड आणि गाऊन घालून न्यायालयात हजर राहणाऱ्या लोकांबद्दल सरन्यायाधीश बोलत होते. ते विधान त्यांच्यासाठीच होते. त्या परिस्थितीची पार्श्वभूमी वेगळी होती, असे मिश्रा यांनी स्पष्ट केले.

--------

### एकल महिला धोरणासाठी मसुदा

विभागाने मसुदा समिती गठीत केली असल्याचे सांगितले. पुढे बोलताना मेघना साकोरे–बोर्डीकर म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेनुसार या धोरणासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून त्या आधारे सक्षमीकरणासाठी उपाययोजना आखण्यात येणार असल्याचे सांगितले. या समितीत विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. समिती एकल महिलांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी धोरणात्मक शिफारसी करणार असून अंमलबजावणीतील अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणार असल्याचेही यावेळी सांगितले. राज्यातील एकल महिलांना सन्मानाने जगता यावे, त्यांना शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी शासन कटिबद्ध आहे. हे धोरण महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. समितीचे कामकाज व समन्वय महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे त्यानी सांगितले.

------------

### इलेक्ट्रिक वाहनांची

तसेच या कर्जाच्या गॅरेंटीचा काही हिस्सा सरकार घेण्याची देखील शक्यता आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसा इलेक्ट्रिक कार आणि टू व्हिलर कर्जाचे व्याज दर देखील कमी करण्यासाठी अर्थ मंत्रालयाकडून बँकांना निर्देश देण्यात आले आहेत. सर्व इलेक्ट्रिक कार खरेदीवर ७.६० टक्क्यांपासून ११.५० टक्क्यांपर्यंत व्याज द्यावे लागते. देशातील सर्वात मोठी बँक एसबीआय अशा प्रकारच्या लोनवर ८.९ ते ११.५० टक्क्यांपर्यंत व्याज लावते. दुसरीकडे इलेक्ट्रिक टू व्हिलर कर्जाचे व्यादर हे १० ते २० टक्क्यांपर्यंत आहेत. इलेक्ट्रिक वाहनांवरील कर्जाचे व्यादर कमी करण्याचा निर्णय पूर्णपणे बँकांवर अवलंबून आहे. इराण – युएस युद्धामुळे अजून पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे त्याच्या किंमती चढ्याच राहण्याची शक्यता आहे. अशात सरकार पेट्रोल आणि डिझेलला पर्यायी साधनांना जास्तीजास्त प्रोत्साहित करत आहे. त्यामुळेच बँकांना यावरील कर्जाचे व्याजदर कमी करण्यास सांगण्यात आलं आहे. फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशनच्या आकड्यानुसार या वर्षी एप्रिल महिन्यात पेट्रोल कारच्या तुलनेत इलेक्ट्रिक कारची विक्री ही सहा टक्के होती. गेल्या वर्षी ती ३.७ टक्के होती. या वर्षी मार्चमध्ये याची हिस्सेदारी ५.१ टक्के राहिली होती. टू व्हिलरच्या बाबतीत बोलायचं झालं तर याची टक्केवारी ९.८ टक्क्यांपर्यंत पोहचली होती.

----------

### अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी

व्हाईट हाऊस ला भेट देण्याचे अधिकृत निमंत्रण दिले आहे.

पंतप्रधानांच्या सेवा तीर्थ या कार्यालयात झालेली ही बैठक दोन्ही देशांच्या भविष्यातील संबंधांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. सुमारे तासभर चाललेल्या या बैठकीत दोन्ही नेत्यांनी २०३० पर्यंत भारत–अमेरिका द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून तो ५०० अब्ज डॉलर्स पर्यंत नेण्याच्या संकल्पावर आणि महत्त्वपूर्ण गुंतवणुकीवर सविस्तर चर्चा केली. सध्याच्या पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जेच्या सुरक्षेबाबत चर्चा झाली असून अमेरिकेने भारताच्या ऊर्जा पुरवठ्यात विविधता आणण्यासाठी आणि सहकार्य वाढवण्यासाठी सकारात्मकता दर्शवली आहे. संरक्षण क्षेत्र, क्रिटिकल टेक्नॉलॉजी म्हणजेच महत्त्वाची प्रगत तंत्रज्ञाने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांमध्ये भागीदारी अधिक दृढ करण्यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला. तसेच इंडो–पॅसिफिक क्षेत्रात मुक्त, खुले आणि सुरक्षित सागरी दळणवळण सुनिश्चित करण्यासाठी दोन्ही देश कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत माहिती दिली की अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांचे स्वागत करताना आनंद झाला. आम्ही भारत–अमेरिका सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारीतील सातत्यपूर्ण प्रगती आणि प्रादेशिक तसेच जागतिक शांतता व सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. भारत आणि अमेरिका जागतिक कल्याणासाठी पुढेही एकत्र काम करत राहतील.

-----------

### पेट्रोल–डिझेलचा तुटवडा; युद्धाचा

नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असताना, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी यावर स्पष्टीकरण दिले. राज्यात कोणताही अधिकृत तुटवडा नसून केंद्र व राज्य सरकारकडे पुरेसा साठा उपलब्ध आहे, असे त्यांनी सांगितले. राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे नव्हे, तर आंतरराष्ट्रीय युद्धाच्या भीतीतून नागरिकांनी केलेल्या अतिरिक्त साठवणुकीमुळे ही तात्पुरती टंचाई निर्माण झाल्याचा दावा सरकारने केला आहे. प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि गरजेपुरतेच इंधन खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. राज्यात निर्माण झालेली ही परिस्थिती युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम आणि त्यानंतर पसरलेल्या अफवांमुळे निर्माण झालेली साखळी आहे, हे स्पष्ट होत आहे. आता सरकार या परिस्थितीवर नियंत्रण मिळवून पुरवठा कधी पूर्ववत करते, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. प्रामुख्याने राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट असल्यानेच इंधन खरेदीसाठी मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याच्या अफवा पसरवल्या गेल्या. यामध्ये सत्यता असू शकत, कारण गेल्या काही वर्षापासून राज्य शासनाने विविध योजना सुरू केल्या आहेत. त्या योजना राजकीय फायद्याच्या असल्या तरी आर्थिक अडचणीच्या ठरत आहेत. त्यामध्ये लाडकी बहीण असो, शेतकरी सन्मान योजना असो किंवा मोफत अन्नधान्य असो या सर्व योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर आर्थिक ताण पडत असून, इंधन खरेदीवर याचा परिणाम होत असल्याचेही आता बोलले जात आहे.

--------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २४ मे २०२६
३

## थोडक्यात

### सोमवारी रामराव ढोक महाराज तर मंगळवारी डॉ. नामदेवशास्त्री यांचे काल्याचे किर्तन

बीड । प्रतिनिधी

भगवानगडाचे महंत डॉ. नामदेवशास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे पुरुषोत्तम मासानिमित्त मंगळवार दिनांक १९ मे पासून भव्य अखंड हरीनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद् भागवत कथा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे, परळी यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. मुंडे महाराजांनी भाविकांना संतश्रेष्ठ भगवानबाबा यांचे आध्यात्मिक व धार्मिक कार्याविषयी विवेचन केले. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी दि. २० रोजी ह.भ.प. लक्ष्मण महाराज पाटील, आळंदी, दि.२१ रोजी ह.भ.प. किशोर महाराज सूर्यवंशी दि.२२ रोजी ह.भ.प. बाळू महाराज गिरगावकर, यांचे कीर्तन संपन्न झाले. सप्ताहात शनिवार दि.२३ रोजी ह.भ.प. भरत महाराज जोगी, दि.२४ रोजी ह.भ.प महाराज जळकेकर, जळगाव, दि.२५ रोजी ह.भ.प. रामराव महाराज धोक, यांचे कीर्तन, दि. न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

### गोविंद खामकर याचे पुर्व उच्च प्राथमिक शिष्यवृती परीक्षेत यश

माजलगाव । प्रतिनिधी




तालुक्यातील नागडगाव येथील रहिवाशी असलेले श्री.विजय खामकर यांचा मुलगा चि.गोविंद खामकर हा श्री. सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालय माजलगाव येथील इयत्ता ५ वी.चा विधार्थी आहे, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृती परीक्षा २०२६ इयत्ता ५ वी. ३०० पैकी १३६ गुणांसह उत्तीर्ण होऊन पात्र झाला आहे.ग्रामीण भागातील विधार्थी हि योग्य पद्धतीने अभ्यास केल्यावर पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृती परीक्षा पात्र होऊ शकतात हे त्याने सिद्ध केले आहे.

या विदयार्थी यशाबद्दल जेष्ठ पत्रकार महेंद्र मस्के,पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे,नागडगावचे माजी सरपंच गजानन खामकर,श्री सिध्देश्वर विद्यालयाचे अध्यक्ष, कार्यवाह, उपाध्यक्ष, शिक्षक, गावातील सर्व शिक्षण प्रेमी नागरिक यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा पाच गुंडांना दणका; एकाच दिवशी 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई







### पोलीस अधीक्षकांचा कडक इशारा



भविष्यातही वाळूचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटखा विक्री करणारे, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे, समाजात जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक, खंडणीखोर, दादागिरी करणारे गुंड आणि बेकायदेशीर जुगार व लॉटरी चालवणाऱ्यांवर 'एमपीडीए' एमपीडीए व 'मकोका' मकोका अंतर्गत अशीच कठोर कारवाई केली जाईल.

– श्री. नवनीत काँवत (पोलीस अधीक्षक, बीड)

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुंडगिरी, गुन्हेगारी व वाळू माफियांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बीड पोलीस आणि प्रशासनाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत आणि जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी संयुक्तपणे मोठी कारवाई करत जिल्ह्यातील पाच सराईत गुंडांवर एकाच दिवशी 'एमपीडीए' (चझऊ-) कायद्यांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. या धडक कारवाईमुळे बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी जगतात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या गुंडांवर झाली कारवाई:

१) जुबरे ऊर्फ मारी ऊर्फ पाप्या मुस्ताक फारोकी (रा. रोजा मोहल्ला, केज) २) मोमीन सलीम मोमीन शब्बीर (रा. मोमीनपुरा, बीड) ३) तुकाराम लक्ष्मण पवार (रा. नवगण राजुरी, ता. बीड) या तीन मुख्य आरोपींव्यतिरिक्त, प्रस्तावित असलेल्या पाच जणांपैकी एक आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असून पोलीस त्याचा ताबा घेत आहेत, तर एक आरोपी फरार असून पोलीस त्याच्या मागावर आहेत.

भयानक गुन्हेगारी इतिहास आणि दहशत:

जुबरे ऊर्फ पाप्या (केज): याच्याविरुद्ध घरात घुसून मारहाण करणे, जबरीने पैसे उकळणे, चोऱ्या, हत्याराने वार करून जखमी करणे आणि जीवे मारण्याच्या धमक्या देणे अशा स्वरूपाचे तब्बल १० गंभीर गुन्हे दाखल आहेत. यातील ९ गुन्हे न्यायप्रविष्ठ असून १ गुन्ह्याचा तपास सुरू आहे. केज शहरात त्याची मोठी दहशत होती.

मोमीन सलीम (पेठ बीड): याच्याविरुद्ध अवैध घातक शस्त्रे बाळगणे, दारूसाठी पैसे मागून मारहाण करणे, चोऱ्या करणे, महिला व मुलींविषयी अश्लील मजकूर सोशल मीडियावर व्हायरल करणे आणि लूटमार करणे असे ६ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

तुकाराम पवार (बीड ग्रामीण): हा आरोपी अवैध गावठी हातभट्टीची दारू तयार करणे, वाहतूक व विक्रीच्या ८ गुन्ह्यांत अडकलेला आहे. तो बेकायदेशीर दारू विकून तरुण पिढीला व्यसनाच्या गर्तेत ढकलत होता व सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करत होता.

या सर्व गुंडांच्या दहशतीमुळे सर्वसामान्य नागरिक त्यांच्याविरुद्ध तक्रार किंवा साक्ष देण्यास धजावत नव्हते.

अशी झाली कारवाईची प्रक्रिया:

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या सूचनेवरून केजचे प्रभारी अधिकारी श्री. स्वप्नील उनवणे, पेठ बीडचे श्री. मारोती खेडकर आणि बीड ग्रामीणचे श्री. सोमनाथ जाधव यांनी या गुंडांना स्थानबद्ध करण्याचे प्रस्ताव जिल्हादंडाधिकाऱ्यांकडे सादर केले होते. या प्रस्तावांची गांभीर्याने दखल घेत जिल्हादंडाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी २२ मे २०२६ रोजी एमपीडीए कायद्यांतर्गत आदेश पारित केले. आदेश मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड व संबंधित पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांनी गोपनीय माहितीच्या आधारे २२ व २३ मे रोजी या गुंडांना तात्काळ ताब्यात घेतले. या सर्वांची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील 'हर्सुल कारागृहात' (हार्सुल जेल) करण्यात आली आहे.

कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार:

ही धडक कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, केजचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्वप्नील उनवणे, मारोती खेडकर, सोमनाथ जाधव, शितलकुमार बल्लाळ (बीड शहर) तसेच सपोनि संदीप मांजरमे, बाळराजे दराडे, प्रितमकुमार पुजारी, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने, उमेश निकम आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# चिखलबीडच्या लगस कुटुंबाला ना. पंकजाताईंचा मदतीचा हात

## दोन चिमुकल्यांची शिक्षणाची जबाबदारी संजय आंधळेंवर

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथील धनगर समाजातील ऊसतोड मजूर ज्ञानदेव लगस यांचा गेल्या पाच ते सहा दिवसांपूर्वी अपघाती मृत्यू झाला होता. याची माहिती मिळतांच राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी त्या कुटुंबीयांना तात्काळ मदतीचा आधार दिला. ही मदत भारतीय जनता युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या हस्ते दिनांक २१ मे २०२६ गुरुवारी चिखलबीड येथील त्यांच्या निवासस्थानी सुपूर्द करण्यात आली.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, ज्येष्ठ कार्यकर्ते उत्तम नेहरकर, श्रीमंत नेहरकर, इंदर मुंडे, दादासाहेब तोगे, हनुमंत मुंडे, पिंटू मुंडे, महादेव मुंडे, कृष्णा मुंडे, रणजीत वडणे, अभिमान मुंडे, रोहित वाघमारे यांच्यासह गावातील असंख्य कार्यकर्ते व नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना संजय आंधळे म्हणाले की, चिखलबीड येथील ऊसतोड मजूर ज्ञानदेव लगस व बबन लगस यांचा लिंबागणेश जवळ अपघात




झाला व ते दोघेही या अपघातात मृत्युमुखी पडले होते. यातील ज्ञानदेव लगस यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. कुटुंबात पाच मुली व एक लहान मुलगा आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने संपूर्ण कुटुंब उघड्यावर पडले आहे. याची माहिती आम्ही राज्याच्या मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना दिली. व त्यांनी तात्काळ आर्थिक मदतीचा हात संबंधित कुटुंबीयांना दिला. व सर्वात लहान मुलगा व मुलगी यांची निवासासह संपूर्ण इंग्रजी माध्यमातून शैक्षणिक जबाबदारी स्वतः मी जबाबदारी पूर्वक घेतली आहे. तसेच लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्फत शासनाकडूनही आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण आटोकाट प्रयत्न करणार असल्याचेही यावेळी बोलतांना संजय आंधळे म्हणाले.

### कठीण प्रसंगात धावले संजय आंधळे

**गोरगरीब व ऊसतोड मजुराच्या कुटुंबाच्या मदतीला धावून जावून त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करत आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी सतत तत्पर असलेले भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी यापूर्वी वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजुर गणेश डोंगरे यांच्या कुटुंबीयांना मोठी मदत मिळवून दिली होती. आज पुन्हा चिखलबीड येथील ऊसतोड मजुर ज्ञानदेव लगस यांच्या कुटुंबीयांना ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडून आर्थिक मदतीचा आधार दिला आहे. कोणाच्याही संकट काळात व कठीण प्रसंगात धाव घेणारे समाजाभिमुख नेतृत्व म्हणून संजय आंधळे यांची प्रतिमा निर्माण होत आहे.**

## ऐन सुगीच्या दिवसांत इंधनाचा तुटवडा : रात्रीच्या अंधारात चालतोय काळाबाजार, प्रशासनाचे दुर्लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यात सध्या शेती कामांची लगबग आणि सुगीचे दिवस सुरू असतानाच, पाटोदा शहरात पेट्रोल आणि डिझेलचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. परंतु, हा तुटवडा नैसर्गिक नसून पेट्रोल पंप चालकांकडून जाणीवपूर्वक निर्माण केलेला कृत्रिम तुटवडा (काळाबाजार) असल्याचा संतप्त आरोप स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांकडून केला जात आहे. दिवसा 'नो स्टॉक'चे फलक न लावता ग्राहकांना हुसकावून लावणारे पंप चालक रात्रीच्या अंधारात मात्र इंधनाची विक्री करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुगीच्या दिवसांत शेतकरी अडचणीतसध्या शेतीचा हंगाम अंतिम टप्प्यात असून ट्रॅक्टर आणि इतर यंत्रांसाठी डिझेलची प्रचंड आवश्यकता आहे. मात्र, पाटोद्यातील पेट्रोल पंपांवर डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची कामे ठप्प झाली आहेत. हक्काचे इंधन मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. रात्रीच्या अंधारात गुपचूप विक्री; ऑनलाईन पेमेंटला नकार दिवसा सर्वसामान्य जनतेला इंधन नाकारणारे पंप चालक रात्रीच्या वेळी पंपावरील लाईट्स बंद करून अंधाराचा फायदा घेत आहेत. रात्रीच्या वेळी छुप्या पद्धतीने इंधनाचे वाटप केले जात असून, यासाठी केवळ रोख (कॅश) पैशांचीच मागणी केली जात आहे. डिजिटल इंडियाच्या युगात ऑनलाईन पेमेंट स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला जात आहे. कॅशच्या बहाण्याने ग्राहकांची अडवणूक करून खिसे कापण्याचे काम सुरू आहे. नियम धाब्यावर: स्टॉक बोर्ड गायबशासकीय नियमांनुसार प्रत्येक पेट्रोल पंपाच्या बाहेर किती साठा (स्टॉक) शिल्लक आहे, याचा फलक लावणे बंधनकारक आहे. मात्र, पाटोद्यातील पंपांवरून हे स्टॉक बोर्ड गायब झाले आहेत. ग्राहकांनी विचारणा केल्यास उद्धट उत्तरे दिली जात असून, सर्व नियम धाब्यावर बसवून हा काळाबाजार उघडपणे सुरू आहे.आणीबाणीच्या परिस्थितीत रुग्णांचे काय?या गंभीर परिस्थितीमुळे सर्वसामान्यांमध्ये तीव्र संताप आहे. शहरात किंवा ग्रामीण भागात एखाद्या कुटुंबात वैद्यकीय आणीबाणी निर्माण झाल्यास, रुग्णाला रुग्णालयात नेण्यासाठी गाड्यांमध्ये पेट्रोल-डिझेल उपलब्ध नाही. अशा अत्यंत संवेदनशील परिस्थितीत जर एखाद्या रुग्णाचा जीव गेला, तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.प्रशासनाने कान टोचण्याची आणि कारवाईची गरजपाटोद्यातील पेट्रोल पंप चालकांच्या या मनमानी कारभाराला आणि अडवणुकीला आता शासनानेच चाप लावण्याची गरज आहे. पुरवठा विभागाने आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तत्काळ चौकशी करावी. नियमबाह्य कृत्य करणाऱ्या आणि काळाबाजार करणाऱ्या अशा पंपांचे परवाने रद्द करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पाटोदा तालुक्यातील जनतेतून होत आहे.

## केदारनाथाचे दर्शन घेत असतानाच वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या ३०१ कोटीच्या आराखड्यास मंजूरी

मुंबई । प्रतिनिधी

चार धाम यात्रेच्या दरम्यान केदारनाथाचे दर्शन घेत असतानाच परळीच्या श्रीक्षेत्र वैद्यनाथ मंदिर तीर्थक्षेत्राचा ३०१ कोटीचा आराखडा मंजूर केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज वर्षा निवासस्थानी जावून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत राज्यातील इतर देवस्थानाबरोबरच परळीच्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिर तीर्थक्षेत्र विकासाच्या ३०१ कोटी रूपयांचा आराखडा मंजूर केला. बैठकीच्या दरम्यान ना. पंकजाताई मुंडे चार धाम यात्रेला गेल्या असल्याने उपस्थित राहू शकल्या नव्हत्या पण त्यांनी केदारनाथाला मनोभावे केलेली प्रार्थना फळास आली. मागील सरकारमध्ये मंत्री असताना वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली होती. चार धाम यात्रेत केदारनाथाचे दर्शन घेत असताना इकडे त्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र आराखड्यास मंजूरी दिली, हा योगायोगच म्हणावा लागेल. या आराखड्यातंर्गत परळीत मंदिर परिसरात मोठया प्रमाणात विकास कामे होणार असून शहराचे रूप पालटणार आहे.

मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज वर्षा निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मंजुरी दिल्याबद्दल केदारनाथाचा प्रसाद आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानले.

# नोकरी नव्हे, पवित्र समाजसेवा जयश्री आघाव आणि शुभांगी बांगर यांच्या निस्वार्थ सेवेने खोकरमोहा अंगणवाडीचे रूप पालटले

पाटोदा । प्रतिनिधी

एका लहान मुलाचे पाऊल जेव्हा पहिल्यांदा घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडते, तेव्हा त्याच्या मनात अनोळखी जगाची भीती आणि डोळ्यात अश्रू असतात. पण खोकरमोहा येथील अंगणवाडी क्रमांक १ मध्ये प्रवेश करताना आज हे चित्र पूर्णपणे बदललेले दिसते. येथे प्रवेश करताच लहानग्यांचा रडण्याचा आवाज नाही, तर त्यांच्या हसण्याचा आणि गाण्यांचा किलबिलाट ऐकायला येतो. या अंगणवाडीत पाऊल ठेवताच एका माउलीची माया मुलांना मिळते, जी त्यांचे अश्रू पुसून त्यांना खेळणी आणि अक्षरांच्या जगात रमवून घेते. ही कौतुकास्पद किमया खोकरमोहा येथील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी आपल्या अहोरात्र परिश्रमांतून करून दाखवली आहे.₹ या दोन महिलांच्या भक्कम प्रयत्नांमुळे घडतेय नवी पिढी (विशेष हायलाईट)अंगणवाडीच्या या यशस्वी वाटचालीच्या मुख्य शिलेदार अंगणवाडी सेविका श्रीमती जयश्री रामकृष्ण आघव आणि मदतनीस श्रीमती शुभांगी महारुद्र बांगर (गर्जे) या आहेत. या दोघींनी आपल्या निस्वार्थ सेवाभावातून आणि अविरत कष्टांतून समाजात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. 'अंगणवाडी' हे केवळ शासकीय नोकरीचे किंवा उपजीविकेचे साधन नसून, ती देशाची भावी पिढी आणि समाज घडवण्याची एक अत्यंत पवित्र जबाबदारी आहे, हे या दोघींनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. त्यांच्या याच प्रामाणिक वृत्तीमुळे आज खोकरमोहा अंगणवाडी क्रमांक १ चा संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक होत आहे.द्ग बालकांचा अंगणवाडीकडे वाढला ओढा; 'खेळत-खेळत' संस्कारांची शिदोरीश्रीमती जयश्री आघव आणि श्रीमती शुभांगी बांगर यांनी बालकांच्या सर्वांगीण



विकासासाठी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, बालमनावर योग्य वयात चांगले संस्कार व्हावेत यासाठी त्या विशेष प्रयत्न करतात. अंगणवाडीत येणाऱ्या मुलांना खेळता-खेळता अक्षरांची ओळख करून देणे, विविध रंग, संख्यांची माहिती देणे आणि त्यांच्यात चांगल्या सवयी रुजवणे याकडे त्यांचा मुख्य भर असतो. खेळकर आणि आनंदी वातावरणामुळे गावातील लहान मुलांचा अंगणवाडीकडे येण्याचा ओढा प्रचंड वाढला असून, पालकांचाही अंगणवाडीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. शिक्षणाची ही पहिली पायरी या मुलांसाठी एक आनंददायी आणि संस्मरणीय प्रवास ठरत आहे.ष कुपोषणाविरुद्ध लढा आणि आरोग्याची भक्कम ढालगावातील मुलांच्या उत्तम आरोग्याची ढाल बनून या दोघी नेहमीच तत्पर असतात. बालकांना वेळेवर आणि नियमितपणे पौष्टिक आहार मिळवून देणे, त्यांच्या वाढीवर लक्ष ठेवण्यासाठी दरमहा त्यांचे वजन आणि उंचीची अचूक मोजणी करणे यात त्या कधीही कसूर करत नाहीत. गावातून कुपोषण पूर्णपणे हद्दपार करणे हेच त्यांचे मुख्य ध्येय आहे. शासनाच्या विविध लसीकरण मोहिमा यशस्वी करणे असो, वा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विभागाशी योग्य समन्वय साधणे असो, यांचे नियोजन नेहमीच अत्यंत चोख आणि वेळेवर असते.० गरोदर व स्तनदा मातांना मोलाचे मार्गदर्शनया दोघींचे कार्य केवळ अंगणवाडीतील मुलांपुरतेच मर्यादित राहिलेले नाही, तर त्यांनी गावातील प्रत्येक कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आहे. गावातील गरोदर महिला आणि स्तनदा मातांची त्या वेळोवेळी भेट घेतात. त्यांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी, वैयक्तिक स्वच्छता का महत्त्वाची आहे आणि नवजात बालकांसाठी योग्य पोषण आहार कसा असावा, याचे अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन करतात. मातांच्या आरोग्याविषयी घेतलेली ही काळजी संपूर्ण गावासाठी वरदान ठरत आहे.₹द्ग ग्रामस्थ आणि प्रशासनाकडून कौतुकाचा वर्षावश्रीमती जयश्री रामकृष्ण आघव आणि श्रीमती शुभांगी महारुद्र बांगर यांच्या या उल्लेखनीय, प्रामाणिक आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल आता सर्व स्तरांतून घेतली जात आहे. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे खोकरमोहा अंगणवाडी क्रमांक १ चा हा 'आदर्श पॅटर्न' इतर सर्व अंगणवाड्यांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण खोकरमोहा ग्रामस्थ, पंचक्रोशीतील नागरिक आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून त्यांच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान ६ वरुन...

### सिंदफणा नदीपात्रात महिलेचा

अडकून राहिला असावा,अशीही चर्चा परिसरात सुरू आहे. पोलिसांनी सांगाड्याचे काही नमुने पुढील तपासणीसाठी अंबेजोगाई आणि छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळांकडे पाठविण्याची तयारी सुरू केली आहे. तपासणी अहवालानंतर मृत महिलेची ओळख, मृत्यूचे कारण आणि घटनेमागील नेमके सत्य स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी पोलीस देवकते,राठोड तसेच पोलीस अंमलदार विष्णू मेत्रे यांनी घटनास्थळी पंचनामा केला असून पोलीस पुढील तपास पोलीस करत आहेत.

### मलकापूरच्या पोलिस पाटलांवर

अर्जदारांनी म्हटले आहे. पोलिस पाटील हे गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियुक्त असताना त्यांनी पक्षपाती भूमिका घेत प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला असून, यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या तक्रारीची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ यांनी संबंधित पोलिस पाटील मलकापूर यांना नोटीस बजावली आहे. दि. २५ मे २०२६ रोजी सकाळी १२ वाजता कार्यालयात उपस्थित राहून या प्रकरणी आपले म्हणणे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या कामात कोणताही विलंब करू नये, असेही नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. यावर कारवाई करून सेवेतून कमी करावे अशी मागणी तक्रारदार यांनी केली आहे. याप्रकरणी कारवाई विलंब झाल्यास जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांची भेट घेणार असल्याचेहि भागवत गित्ते यांनी सांगितले.

### शिवसेना माजलगाव विधानसभा

सचिव अशोक पटवर्धन व बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली.

धोंडीराम जाधव यांनी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारसरणीचा प्रचार-प्रसार करत पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करावे, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

यावेळी धोंडीराम जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करताना रोहयो मंत्री तथा बीड जिल्हा संपर्कमंत्री भरतशेठ गोगावले, शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे, जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, माजलगाव तालुका प्रमुख तुकाराम बापू येवले तसेच शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके उपस्थित होते.

### जनावरे चोरी करणारी

गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. न्यायालयाने आरोपींची पोलीस कोठडी मंजूर केली असून, या गुन्ह्यात आणखी कोणते साथीदार आहेत आणि चोरीला गेलेला मुद्देमाल कोठे आहे, याचा पुढील तपास पोलीस हवालदार पाटोळे करत आहेत.

या पथकाने केली कारवाई:

सदरची धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पेठ बीडचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा, पोलीस हेकॉ. सुभाष मोठे (१३५३), नितीन राठोड (१८०३), अमृत पाटोळे (१३७९), पोलीस अंमलदार विष्णू गुजर (२२१८), औदुंबर गिरी (१९८७) आणि पांडुरंग परजने (१५५१) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### पीक विमा मंजुरीसाठी

तसेच, दिनांक ८ जून रोजी प्रत्येक मतदारसंघातील शेतकऱ्यांनी आपल्या-आपल्या आमदारांच्या कार्यालयात जाऊन पीक विमा प्रश्नावर भूमिका मांडावी, असे आवाहन भाई गंगाभिषण थावरे यांनी केले आहे. दरम्यान, माजलगाव मतदारसंघातील शेतकरी आमदार प्रकाश सोळंके यांच्या कार्यालयात जाऊन विमा मंजुरीसाठी निवेदन देणार असल्याचे थावरे म्हणाले.

### कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या

आणि संरक्षणासाठी सुरक्षितपणे गोशाळेत दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी आरोपी सलमान मोहंमद कुरेशी याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

यांनी केली कारवाई: सदरची धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, उपविभागीय पोलीस अधिकारी (गेवराई उपविभाग) अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक राम खोत, पोलीस हवालदार कल्याण राठोड, संजय सोनवणे, महिला पोलीस हवालदार रेशमा पौळे, पोलीस नाईक अमोल सोनवणे, पोलीस कॉन्स्टेबल गोरक्ष डोके, धीरज खांडेकर, भरत शेळके आणि रामराजे काकडे यांच्या पथकाने केली.




# शक्तिपीठ महामार्गाने शेतकऱ्यांचा संताप उफाळला

## जमीन आमची, निर्णय तुमचा कसा?

हिंगोली / प्रतिनिधी

नागपूर ते गोवा प्रवास जलद आणि सुलभ करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या शक्तिपीठ महामार्गाला औंढा तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध सुरू केला आहे. जमीन आमची, पण निर्णय शासनाचा अशी भावना व्यक्त करत शेतकरी आता आक्रमक झाले आहेत. कमी मोबदला, सुपीक जमीन जाण्याची भीती आणि भविष्यातील उदरनिर्वाहाचा प्रश्न यामुळे गावागावांत संतापाची लाट उसळली आहे.

या महामार्गासाठी औंढा तालुक्यातील सात गावांमधून तब्बल ७१९ एकर जमीन संपादित केली जाणार आहे. प्रशासनाने भूसंपादनाची प्रक्रिया वेगाने सुरू केली असली, तरी शेतकऱ्यांनी मात्र या निर्णयाविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. महामार्गाचा प्रस्तावित मार्ग औंढा तालुक्यातील सेंदूरसना, मार्डी, शिरडशहापूर, उमरा, सिरला तांडा, वडद, रांजाळा या गावांमधून जाणार आहे. यामध्ये सर्वाधिक २०९ एकर जमीन शिरडशहापूर गावातील संपादित होणार असून, सेंदूरसना आणि उमरा परिसरातीलही मोठ्या प्रमाणात शेती जमीन जाणार आहे. महामार्गासाठी आवश्यक भूसंपादनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संयुक्त



मोजणी, ड्रोन सर्वेक्षण, सातबारा उतारे तपासणी, खातेदार यादी संकलन, गट क्रमांक आणि जमीन प्रकार पडताळणी, एनए परवानगी तपासणी अशी प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, ही प्रक्रिया सुरू होताच शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. शेतकऱ्यांचा सर्वात मोठा आक्षेप म्हणजे मिळणारा मोबदला. शासनाकडून दिला जाणारा दर हा बाजारभावाच्या तुलनेत खूपच कमी असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. विशेषतः रस्त्यालगतची जमीन, सिंचन सुविधा असलेली जमीन, कॅनॉललगतची सुपीक शेती मोठ्या प्रमाणात अधिग्रहित होणार असल्याने भविष्यात मोठे आर्थिक नुकसान होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. रांजाळा परिसरातील कॅनॉललगतची जमीन गेल्यास कोट्यवधी रुपयांचे नुकसान होईल, असे स्थानिक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, जमीन ही फक्त मालमत्ता नसून त्यांच्या संसाराचा आधार आहे. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. महामार्गासाठी जमीन गेल्यानंतर त्याच दर्जाची जमीन पुन्हा मिळणार नाही. शेती उत्पादन घटेल. रोजगाराचा आधार संपेल. कुटुंब आर्थिक संकटात जाईल. अशी भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी महामार्गाच्या उपयुक्ततेवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, स्थानिक पातळीवरच शेतमालाची विक्री होते. महामार्गामुळे थेट आर्थिक फायदा होणार नाही. उलट जमीन गेल्याने कायमस्वरूपी नुकसान होईल. त्यामुळे महामार्गासाठी आमच्या पिढ्यानपिढ्यांच्या जमिनी हिरावून घेऊ नका, अशी भावनिक मागणी शेतकरी करत आहेत. महामार्गाच्या चर्चेमुळे संबंधित गावांमध्ये चिंता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी शेतकरी एकत्र येऊन बैठका घेत असून, योग्य मोबदला आणि पुनर्वसनाशिवाय जमीन देणार नसल्याचा इशारा दिला जात आहे.

## बी-बियाणे खरेदी करताना अशी घ्या काळजी

चांगले उत्पादन मिळण्यासाठी दर्जेदार बियाण्यांची निवड ही शेतीतील सर्वात महत्त्वाची बाब मानली जाते. मात्र बाजारात अनेकदा बनावट, निकृष्ट किंवा मुदतबाह्य बियाणे विक्रीला येतात. अशा बियाण्यांमुळे उगवण कमी होते, पीक एकसारखे येत नाही आणि शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे बियाणे खरेदी करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. बियाणे खरेदी करण्यापूर्वी आपल्या भागातील हवामान, जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पीक आणि वाण निवडावा. आपल्या परिसरासाठी शिफारस केलेले आणि रोगप्रतिकारक वाणांना प्राधान्य द्यावे.

खरेदी करतानाची काळजी :बियाणे नेहमी परवानाधारक आणि नोंदणीकृत विक्रेत्याकडूनच खरेदी करावे. खरेदी करताना बियाण्याच्या पिशवीवरील टॅग नीट तपासावा. त्यावरील पीकाचे नाव, वाण, प्रकार, उगवणक्षमता, बीज परिक्षणाची तारीख, भौतिकशुद्धता, बियाण्याच्या चाचणीची तारीख, बियाण्याचे वर्ग, लॉट नंबर, कंपनीचे नाव, त्यांचा संपर्क आणि वैधता कालावधी दिलेला असतो, तो तपासावा. प्रत्येक खाद्यपदार्थावर आपण वैधता तारीख म्हणजे एक्सपायरी डेट तपासून घेतो तसेच बियाण्याच्या पाकीटावरील वैधता तारीख तपासावी. प्रमाणित बियाण्याच्या खूण चिठ्ठीवर अधिकाऱ्याची सही असल्याची खात्री करून घ्यावी. बियाण्याला कीड आणि रोग टाळण्यासाठी कीटकनाशक आणि बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केली असल्याचा उल्लेख आणि त्याची नावे टॅगवर असावीत.

खरेदी करताना ही काळजी घ्या :मुदतबाह्य किंवा पॅकिंग फुटलेले बियाणे खरेदी करू नये. कमी दराचे आमिष, रस्त्याच्या कडेला मिळणारे किंवा ऑनलाइन अनोळखी स्त्रोतांवरील बियाणे घेणे टाळावे.

बियाण्याचा टॅग ओळखा : प्रमाणित



बियाण्याच्या टॅगचा रंगही महत्त्वाचा असतो. पिवळा टॅग म्हणजे मूलभूत बियाणे, पांढरा टॅग पायाभूत बियाणे, निळा टॅग प्रमाणित बियाणे आणि हिरवा टॅग सत्यप्रत बियाणे दाखवतात. आपण प्रमाणित बियाणे लागवडीसाठी निवडावे.प्रमाणित बियाणे तयार करण्यासाठी पायाभूत बियाणे वापरली जातात. तर पायाभूत बियाणे तयार करण्यासाठी मूलभूत बियाणे तयार केले जातात. तर बीजोत्पादनासाठीसुद्धा प्रमाणित बियाणे फायदेशीर ठरतात.


पावती घेणे आवश्यक : बियाणे खरेदी केल्यानंतर सर्वात महत्त्वाचे म्हणजे पक्की पावती घेणे महत्त्वाचे आहे. कितीही घाईत असो किंवा विक्रीदार ओळखीचा असो पावती घेणे आवश्यक आहे. पावतीमध्ये विक्रेत्याचे नाव, बियाण्याचे नाव, कंपनी, लॉट नंबर, वजन आणि किंमत लिहिलेली असावी. भविष्यात तक्रार करायची वेळ आल्यास ही पावती महत्त्वाचा पुरावा ठरते. तसेच बियाण्याचे टॅग, पिशवी आणि नमुना म्हणून थोडे बियाणे जपून ठेवावे. बियाण्याचे पॅकेट फोडताना ते टॅगच्या उलट्या बाजूने फोडावे.

अशी करा तक्रार : रपेरणीनंतर उगवण कमी झाली किंवा पिकात भेसळ दिसल्यास किंवा काही तक्रार असल्यास तात्काळ कृषि विभागाकडे लेखी तक्रार द्यावी. तक्रार करण्यासाठी पावती हाच सर्वात महत्त्वाचा पुरावा मानला जातो. त्याशिवाय तक्रार ग्राह्य धरली जात नाही. कंपनीने बियाण्याच्या नुकसान भरपाईला नकार दिल्यास शेतकरी ग्राहक मंजाकडे तक्रार नोंदवून भरपाई मागू शकतात.

## बटेर पालनातून होईल बक्कळ कमाई; कमी खर्चात, अधिक नफा!

देशातील अनेक भागांमध्ये सध्या बटेर पालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कमी पाणी, कमी जागेत आणि कमी खर्चात देखील हा व्यवसाय केला जाऊ शकतो. ब्रॉयलर पोल्ट्री फार्मिंगच्या तुलनेत अल्प गुंतवणुकीमध्ये देखील या व्ययसायातून मोठ्या प्रमाणात नफा कमावला जाऊ शकतो. बटेर हा आकाराने अगदी लहान असलेला पक्षी राज्यातील अनेक भागांमध्ये 'लावी', काही भागांमध्ये 'लावरी' या ग्रामीण नावांनी ओळखला जातो. या पक्षाचे मांस हे गुणवत्तापूर्ण असते. त्यामुळे लोक त्याची खरेदी करताना पैशाचा कोणताही विचार करत नाही. या पक्षाच्या मांसाला अन्य पक्षांच्या तुलनेत किंमतही अधिक मिळते. शिवाय ब्रॉयलर कोंबडी पालनाच्या तुलनेत यासाठी येणारा खर्च देखील अत्यंत कमी असतो. ज्यामुळे सध्या देशात जवळपास ३२ दशलक्ष इतक्या जपानी बटेर प्रजातीच्या पक्षांचे व्यावसायिक स्वरूपात पालन केले जात आहे.

जपानी प्रजाती विकसित : पोल्ट्री फार्मिंग उद्योगामध्ये कोंबडीपालन, बदक पालन यानंतर बटेर पक्षांच्या पालनाला देशात तिसरे स्थान आहे. भारतात जवळपास १९७० च्या दशकापासून बटेर पक्ष्यांच्या संरक्षणासाठी कायदा करण्यात आला आहे. मात्र त्यानंतर देशात




१९७४ साली व्यावसायिक पालनासाठी बटेर पक्षाची जपानी प्रजाती विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे तेव्हापासून बटेर पालन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. किती मिळतो नफा? पोल्ट्री क्षेत्रातील जाणकारांच्या मते, भारतामध्ये जपानी बटेर पक्षाचे पालन सहजतेने केले जात आहे. विशेष म्हणजे त्याच्या पालनासाठी जोखीम देखील खूप कमी असते. मात्र असे असले तरी बटेरच्या पिल्लांची योग्य तापमानात काळजी घेणे आवश्यक असते. एका दिवसाचे बटेरची छोटे पिल्ले विकत घेऊन कोणी व्यवसाय सुरु करत असेल तर ही पिल्ले जवळपास ५ आठवड्यांमध्ये विक्रीसाठी तयार होतात. खाद्यासह शेडचा खर्चही कमी : बटेर पालन करण्यासाठी ब्रॉयलर कोंबडी पालनाच्या तुलनेत खूपच कमी जागा लागते. ३ फूट रुंद व ५ फूट उंच असलेले बांबू जाळीचे शेड बांधून, त्यात ४०-४५ बटेर पक्षी पाळले जाऊ शकतात. अर्थात १५ स्क्वेअर फूट जाळीमध्ये ३ लेअरमध्ये १३० ते १५० बटेर पक्षी पाळता येतात. बाजारात खाद्य उपलब्ध असते ते तुम्ही बटेर पक्षांसाठी खरेदी करू शकता. एका बटेर पक्षाला एका दिवसासाठी सरासरी ५-१० ग्रॅम खाद्य आवश्यक असते.

अंडी विक्रीतूनही नफा : बटेर हा मांस उत्पादनासाठी पाळला जात असला तरी त्याच्या अंड्यांना देखील मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे पूर्ण विकसित झालेला ५ आठवड्यांचा पक्षी मांस विक्रीसाठी विक्री करण्याअगोदर त्यापासून मिळणाऱ्या अंड्यांमधून देखील आर्थिक कमाई केली जाऊ शकते. त्यामुळे या व्ययसायातून दुप्पट नफा कमावता येतो. ग्रामीण भागात लावीच्या अंड्यांना मोठी मागणी असते. तसेच सध्या आरोग्याच्या दृष्टीने जागरूकता वाढल्याने शहरातही या अंड्यांना मागणी असते.

## सुक्ष्म जिवाणू आणि जमीनीच्या पोतमध्ये सुधारणा

सूक्ष्म जिवाणूंच्या वाढीस पोषक असणाऱ्या जमिनीच्या पोताचा व सेंद्रिय पदार्थाचा हास यांच्या संबंधाचा विचार केला तर भारी जमिनीपेक्षा हलक्या व जमिनीत ऱ्हास अधिक होतो. याचे कारण म्हणजे हलक्या जमिनीत हवा खेळती राहते व त्यामुळे कुजण्याचा वेग वाढतो. याउलट भारी जमिनीत हवा खेळती राहण्यास प्रतिबंध होतो व कुजण्याचा वेग मंदावतो. याशिवाय भारी जमिनीत सेंद्रिय पदार्थ व त्यांच्या ज्वलनातून निर्माण झालेले उपपदार्थ चिकणमातीच्या कणांवर स्थिर राहिल्याने त्यांचा ऱ्हास कमी होतो. हवा जितकी अधिक खेळती राहील तितका. सेंद्रिय कर्बाचा कुजण्याचा वेग जास्त राहतो. या बाबींचा संबंध जमिनीच्या मशागतीच्या प्रकाराशीही जवळचा आहे. जितकी मशागत जास्त तितकी जमिनीत खोलवर हवा खेळती राहून सेंद्रिय कर्बाचा -हास झपाट्याने होतो. त्यामुळे सेंद्रिय कर्बाचा -हास कमी करण्यासाठी जमिनीच्या मशागतीची पातळी किमान व हलक्या स्वरुपाची ठेवणे अधिक श्रेयस्कर ठरेल. विशेषत: ही बाब हलक्या ते मध्यम जमिनीत अधिक कटाक्षाने लक्षात ठेवली पाहिजे.

तापमानाचा परिणाम : जमिनीचे तापमान हा दुसरा घटक आहे. तापमान जितके जादा तेवढा सेंद्रिय पदार्थांचा ऱ्हास अधिक होतो. काही शास्त्रज्ञाने सेंद्रिय पदार्थांच्या कुजण्याचा वेग ठरवणाऱ्या अनेक घटकांचा व त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला



आहे की एखाद्या भौगोलिक स्थानाचे सरासरी तापमान १० अंश सेल्सिअसने वाढले तर सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग कमी करण्यासाठी जमिनीवर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन व ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करता येतो. परंतु ही व्यवस्थापन पद्धती सर्व ठिकाणी अधिक असलेल्या जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे तापमानाचे नियमन तर आहेच परंतु त्याशिवाय तेथे सेंद्रिय पदार्थांची निर्मितीही फार मोठ्या प्रमाणात होत असते. कर्बाचे गुणोत्तर : सेंद्रिय पदार्थातील कर्बाचे गुणोत्तर जेवढे कमी तेवढा सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग अधिक आढळून येतो. म्हणूनच द्विदलवर्गीय पिकांचे अवशेष हे एकदल पिकांच्या तुलनेने लवकर कुजतात व पर्यायाने सेंद्रिय पदार्थांचा वेगाने व्हास होतो. म्हणून कर्ब: नत्राचे वेगवेगळे गुणोत्तर असणारे शेतातच उपलब्ध होणारे सेंद्रिय पदार्थ वापरल्यास कर्बाची पातळी बऱ्यापैकी राखण्यास मदत होते. सूक्ष्म जिवाणूंची कार्ये : टाकाऊ सेंद्रिय पदार्थ व त्यांचे अवशेष कुजविणे. हवेतील नत्राचे जमिनीत स्थिरीकरण करणे. वनस्पतीतील अन्नद्रव्यांचे चक्रीकरण करून त्यांची उपलब्धता वाढविणे. संप्रेरकाची निर्मिती करून अविद्राव्य अन्नद्रव्यांचे रुपांतर विद्राव्य स्वरुपात करून त्यांची उपलब्धता वाढविणे. कार्बनयुक्त पॉलीसॅकराइड्स या संयुगांची निर्मिती करून जमिनीतील मातीच्या कणांचे संग्रहीकरण सुधारविणे. त्यामुळे जमिनीच्या प्राकृतिक गुणधर्मात सुधारणा होणे. जमिनीत मातीत प्रवेश केलेल्या कीटकनाशकासारख्या विषारी द्रव्यांचे विषारीपण कमी करणे.जमिनीत प्रतिजैविके निर्माण करून पिकांना उपद्रवी असलेल्या सूक्ष्मजिवाणूंचा नाश करणे. सेंद्रिय पदार्थाचे विघटन करून साध्या सेंद्रिय संयुगात रुपांतर करणे (ही संयुगे पिकांकडून सहज शोषून घेतली जातात. उदा. ॲमिनो आम्ले). शेतकऱ्यांनो देशात हुकूमशाहाने जन्म घेतलाय आत्महत्या नको संघटिक व्हा जमिनीत प्रवेश केलेल्या अनावश्यक अवजड धातूंचा सेंद्रिय संयुगांबरोबर संयोग पावून त्यांचे पिकांच्या मूळांकडून होणारे शोषण थांबविणे. मातीद्वारे रोगनिर्मिती करणाऱ्या जिवाणूंच्या वाढीस प्रतिबंध करणे.पिकांच्या वाढीस आवश्यक असणारी नत्र, स्फुरद, गंधक, लोह इत्यादी अन्नद्रव्ये आपण सेंद्रिय खतांमार्फत पुरवितो. मात्र त्यांचे रुपांतर असेंद्रिय अथवा निरेंद्रिय स्वरुपात झाल्यावरच ती पिकांना उपलब्ध होतात. अन्नद्रव्यांच्या रुपांतराच्या या क्रियेत विविध सूक्ष्म जिवाणूंचे कार्य सविस्तर जाणून घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे सेंद्रिय शेतीत पिकांना अन्नपुरवठा कसा करावा याची कल्पना येईल.




### महत्वाच्या घटना

१०८५ : कॅस्टिलचा राजा आल्फोन्सो सहाव्याने स्पेनमधील टोलेडो शहर मूरांकडून जिंकले.
१६११ : मुघल शासक जहागीर यांनी महरुन्निसा यांच्याबरोबर विवाह केला. यानंतर त्यांचे नाव नूरजहाँ असे पडले.
१६५९ : रिचर्ड क्रॉमवेलने इंग्लंडच्या रक्षकपदाचा राजीनामा दिला.
१६६६ : शिवाजी महाराज आग्रा येथे नजरकैदेत.
१८१० : सेमाना दि मेयो आर्जेन्टिनात नागरिकांनी बोयनोस एर्समधून स्पेनच्या व्हाइसरॉयला हाकलले.
१८६५ : अमेरिकन यादवी युद्ध अलाबामात मोबिल शहराजवळ शस्त्रसाठ्यात स्फोट. ३०० ठार.
१९७० : बोईंग संगणक सेवेची स्थापना करण्यात आली.
१८९५ : फोर्मोसाच्या प्रजासत्ताक ची स्थापना.
१९२६ : युक्रेनच्या परागंदा सरकारच्या अध्यक्ष सिमोन पेटलियुराची हत्या.
१९३५ : जेसी ओवेन्सने ४५ मिनिटात वेगवेकळ्या शर्यतींमध्ये चार विश्वविक्रम नोंदवले.
१९३८ : स्पॅनिश गृहयुद्ध अलिकान्ते शहरावर बॉम्बफेक. ३१३ ठार.
१९४० : दुसरे महायुद्ध डंकर्कची लढाई सुरू.
१९४६ : अब्दुल्ला जॉर्डनच्या राजेपदी.
१९५३ : अमेरिकेच्या सैन्याने परमाणुशस्त्रे असलेल्या तोफगोळ्यांची चाचणी केली.
१९५५ : जगातील उंचीनुसार तिसरे शिखर कांचनगंगा जॉर्ज बँड आणि जो ब्राऊन यांनी प्रथमच सर केले.
१९६१ : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीने ''दशक संपायच्या आत चंद्रावर माणूस'' पाठवण्याची घोषणा केली.
१९६३ : इथियोपियाची राजधानी अदिस अबाबामध्ये आफ्रिकन एकता संघटनेची स्थापना.
१९७७ : चिनी सरकारने विल्यम शेक्सपिअरच्या साहित्यावरील बंदी उठवली. सुमारे १० वर्षे ही बंदी अमलात होती.
१९७९ : अमेरिकन एरलाइन्स फ्लाइट १९१ हे डी.सी.१० जातीचे विमान शिकागोच्या ओहेर विमानतळावरून निघाल्यावर कोसळले. जमीनीवरील दोघांसह २७३ ठार.
१९८१ : सौदी अरेबियाची राजधानी रियाधमध्ये अखाती सहकार समितीची स्थापना.
१९८२ : फॉकलंड युद्ध आर्जेन्टिनाने युनायटेड किंग्डमची युद्धनौका एच.एम.एस. कोव्हेन्ट्री बुडवली.
१९८५ : बांगलादेशमध्ये वादळ. १०,०००हून अधिक ठार.
१९९२ : विख्यात बंगाली साहित्यिक सुभाष मुखोपाध्याय यांना १९९१ चा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर.
१९९५ : बॉस्नियाच्या सर्ब सैन्याने ७२ तरुणांना ठार मारले.
१९९७ : सियेरा लिओनमध्ये उठाव. मेजर जॉन पॉली कोरोमाहने सत्ता बळकावली.
१९९९ : सुमारे १०० वर्षांपासून पंढरपूरला येणार्या लाखो वारकर्यांची आणि नागरिकांची सेवा केलेल्या पंढरपूर-कुर्डुवाडी या नॅरोगेज रेल्वेला निरोप देण्यात आला.
२००१ : कॉलोराडोतील बोल्डर शहराचा एरिक वाइहेनमायर हा एव्हरेस्ट सर करणारा प्रथम अंध व्यक्ती ठरला. त्याच्या बरोबरचा न्यू कनान, कॉनेटिकटचा शेरमान बुल सगळ्यात वयस्कर व्यक्ती (६४ वर्षे) ठरला.
२००२ : चायना एरलाइन्स फ्लाइट ६११ हे बोईंग ७४७ जातीचे विमान तैवानच्या सामुद्रधुनीत कोसळले. २२५ ठार.
२००२ : मोझाम्बिकच्या तेंगा शहराजवळ रेल्वे गाडीला अपघात १९७ ठार.
२००३ : नेस्टर कर्चनर आर्जेन्टिनाच्या राष्ट्राध्यक्षपदी.
२००३ : चिली देशाने पहिल्यांदा टेनिसचा विश्वकप जिंकला.
२०११ : द ओपराह विन्फ्रे शो चा शेवट करण्यात आला. ओपराह विन्फ्रे यांनी हा शो पंचवीस वर्ष चालवला होता.
२०१२ : स्पेसएक्स ड्रॅगन हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकांसह यशस्वीरित्या एकत्र येणारे पहिले व्यावसायिक अंतराळयान ठरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५८ : महमुद बेगडा, गुजरातचा सुलतान.
१७१३ : जॉन स्टुअर्ट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१८०३ : राल्फ वाल्डो एमर्सन, अमेरिकन लेखक व तत्त्वज्ञानी.
१८३१ : ब्रिटिश हवामानशास्त्रज्ञ सर जॉन इलियट यांचा जन्म. (मृत्यू: १८ मार्च १९०८ व्हार, फ्रान्स)
१८७८ : ब्रिटीश कालीन भारतातील थोर राष्ट्रवादी लेखक, पत्रकार, संपादक आणि राजकीय कार्यकर्ते रामकृष्ण पिल्लई यांचा जन्मदिन.
१८८६ : क्रांतिकारक रास बिहारी घोष यांचा जन्म. (मृत्यू: २१ जानेवारी १९४५)
१८९५ : इतिहासकार व लेखक त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६३)
१८९९ : स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक, बंगाली कवी काझी नझरुल इस्लाम यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट १९७६)
१९२६ : गुजराती साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय कादंबरीकार, नाटककार आणि अनुवादक धीरुबेन गोरधनभाई पटेल यांचा जन्मदिन.
१९२७ : अमेरिकन लेखक रॉबर्ट लुडलुम यांचा जन्म. (मृत्यू: १२ मार्च २००१)
१९३३ : त्रिनिदाद आणि टोबॅगो देशाचे माजी पंतप्रधान बासदेव पांडे यांचा जन्मदिन.
१९४६ : सेवानिवृत्त भारतीय क्रिकेटपटू बिशन सिंह बेदी यांचा जन्मदिन.
१९५४ : रतीय अभिनेता, निर्माता आणि राजकारणी मुरली यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑगस्ट २००९)
१९७० : मॉरिस क्रॉफ्ट, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९७२ : भारतीय अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक करण जोहर यांचा जन्म.
१९७४ : विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांतील शांती स्वरूप भटनागर पुरस्कार तसचं, इन्फोसिस पुरस्कार सन्मानित प्रख्यात शिकागो विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापक मुळ भारतीय वंशीय यमुना कृष्णन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५४ : आधुनिक भारतीय व्यायामविद्येचे प्रवर्तक, कन्या आरोग्य मंदिरा चे संस्थापक गजानन यशवंत ताम्हणे तथा माणिकराव यांचे निधन. (जन्म: ३१ डिसेंबर १८७८)
१९७४ : स्वतंत्र संयुक्त ओडिशा राज्याचे आर्किटेक्ट(रचनाकार) महाराजा सर कृष्णचंद्र गजपती नारायण देव यांचे निधन.
१९९८ : लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीतील संगीतकार लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर यांचे निधन. (जन्म: ३ नोव्हेंबर १९३७)
१९९९ : डॉ. बी. डी. टिळक, संचालक पुण्याची राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा.

# सतत गायब राहणाऱ्या गटविकास अधिकाऱ्याच्या रिकाम्या खुर्चीला घातला हार !

जाफ्राबाद। प्रतिनिधी

जाफ्राबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कर्तव्य विसरून सतत गैरहजर राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अधिकाऱ्यांच्या या बेजबाबदारपणामुळे तालुक्यातील गोरगरीब जनतेची घरकुल, सिंचन विहीर आणि शौचालयांची कामे रखडली असून ग्रामीण भागाचा विकास पूर्णपणे ठप्प झाला आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभाराचा तीव्र निषेध करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) थेट गटविकास अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीलाच पुष्पहार अर्पण करून गांधीगिरी मार्गानं प्रशासनाचे वाभाडे काढले. या अनोख्या आंदोलनाने जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली असून, येत्या ७ दिवसांत कायमस्वरूपी गटविकास अधिकारी न मिळाल्यास थेट 'मनसे स्टाईल'ने खळ्ळखट्याक आंदोलन करू, असा थेट आणि आक्रमक इशारा मनसेने दिला आहे. जनतेची कामे खोळंबली, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष !

जाफ्राबाद पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेचे हाल बेहाल झाले आहेत. घरकुल योजना, ग्रामपंचायतींना मिळणारा विकास निधी, विविध शासकीय योजनांचे प्रस्ताव आणि ग्रामस्तरावरील विकासकामांच्या मंजुरी केवळ अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीअभावी रखडल्या आहेत. गोरगरीब जनता आपल्या हक्काच्या कामासाठी पंचायत समितीचे उंबरठे झिजवत आहे. मात्र, साहेब खुर्चीवरून गायब आहेत ! दुसरीकडे स्थानिक लोकप्रतिनिधीही या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत,



असा संतप्त आरोप मनसेच्या वतीने करण्यात आला. अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांना मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. आणि रिकाम्या खुर्चीला घातला हार ! प्रशासनाच्या या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभाराला चव्हाट्यावर आणण्यासाठी मनसेचे तालुका सचिव पंढरीनाथ म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी थेट गटविकास अधिकाऱ्यांचे दालन गाठले. अधिकारी जागेवर नसल्याचे पाहून मनसैनिकांनी थेट त्यांच्या रिकाम्या खुर्चीलाच पुष्पहार अर्पण केला आणि जोरदार घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. या आंदोलनानंतर मनसेच्या वतीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले. याप्रसंगी मनसेचे विजय भाटसोळे, संजय शिंदे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.मनसेचा ७ दिवसांचा 'अल्टिमेटम'; अन्यथा खळ्ळखट्याक ! मनसेने जिल्हा प्रशासनाला आणि जाफ्राबाद पोलीस ठाण्याला दिलेल्या निवेदनात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. जाफ्राबाद पंचायत समितीला तात्काळ स्वतंत्र आणि कार्यतत्पर गटविकास अधिकारी नियुक्त करण्यात यावा. दुसरी मागणीः रखडलेली सर्व विकासकामे आणि घरकुल योजनांचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. प्रशासनाला आम्ही ७ दिवसांचा वेळ देत आहोत. या कालावधीत जर जाफ्राबादला हक्काचा अधिकारी मिळाला नाही आणि जनतेची कामे सुरू झाली नाहीत, तर यापुढे कोणतेही निवेदन दिले जाणार नाही. थेट मनसे स्टाईलने 'खळ्ळखट्याक आंदोलन' केले जाईल आणि या दरम्यान होणाऱ्या तीव्र परिणामांना सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल ! आता या आक्रमक इशाऱ्यानंतर झोपलेले जिल्हा प्रशासन जागे होणार का? आणि जाफ्राबादच्या जनतेला त्यांचा हक्काचा अधिकारी मिळणार का? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## वैश्याव्यवसाय करणाऱ्या लॉजवर छापा

जालना। प्रतिनिधी

श्री तेघबीर सिंह संधु पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी यांचे वेश्या व्यवसायावर असलेल्या ठिकाणाची गोपनीय माहिती मिळाली असता अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि योगेश चव्हाण यांना आदेशित केल्याने पोलीस सदर ठिकाणी जाऊन बसस्टॅन्ड रोड वरील न्यु शिवगंगा लॉज येथे लॉज मालक संदीप हे स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी त्यांच्या न्यु शिवगंगा लॉजमधे बाहेरुन महीलांना आणुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करीत आहे. सुमारे १५.३० वाजता छापा कारवाई केली ०७ पीडीत महीलांसह रोख ७७,३८०/- असा मुद्देमाल मिळुन आले आहे. सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सदर बाजार पोलीस हे करत आहे. गुन्ह्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.



गुरंन-महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आरोपी न्यु शिवगंगा लॉजचे मालक संदीप राऊत व २) बाबुलाल रामदास भटकर रा. आसरा ता. भातकुली जि. अमरावती याने किरायाने घेतलेले असुन हे दोघे फरार आहे.

३) हॉटेल मॅनेजर विलास शिवाजी भानुसे वय ३२ वर्ष रा. पिरकल्याण ता.जि. जालना व ग्राहक गंगाधर सिरसाट वय-७२ वर्ष रा. सिंधी पिंपळगाव ता. बदनापुर जि. जालना , दिपक थोरात वय ३४ वर्ष रा. रा. बोरी ता. अंबड जि. जालना ,चांगदेव निटवे वय २३ वर्ष रा. नातेपुते ता. माळसरस जि. सोलापुर ह.मु. राजुर चौफुल्ली जि. जालना ७) बाबासाहेब शेवाळ वय- ५५ वर्ष रा. काजळा ता. बदनापुर जि. जालना, तातेराव मगर वय ६५ रा. राममुर्ती ता. जि. जालना, भास्कर मोरे वय - ५५ वर्ष रा. सोयनदेव ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा सदरील आरोपी विरुद्ध छापा टाकून कारवाई केली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबोर सिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि योगेश चव्हाण, पोउपनि रवी जोशी, पोउपनि संजय गवळी, महिला अंमलदार संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक सपोउपनि संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

## शिर्डीत क्षेपणास्त्र आणि तोफगोळा निर्मिती केंद्राचे उद्घाटन

### आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होताना पाहायला मिळतंय - मुख्यमंत्री

शिर्डी । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पाची प्रचिती आज शिर्डीत पाहायला मिळाली. देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शिर्डी येथे क्षेपणास्त्र संकुल आणि तोफगोळा उत्पादन लाइनचे भव्य उद्घाटन पार पडले. या प्रकल्पामुळे संरक्षण क्षेत्रात भारत आता केवळ आयातदार न राहता एक मोठा निर्यातदार देश बनला आहे, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ''संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी देशाच्या संरक्षण क्षेत्राला स्वावलंबी बनवण्याची मोठी जबाबदारी स्वीकारली आहे. पूर्वी आपण शस्त्रास्त्रांसाठी पूर्णपणे आयातीवर अवलंबून होतो, मात्र आज आपण जगातील सर्वोत्तम ड्रोन्स आणि मिसाईल्स भारतात तयार करत आहोत. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न आज सत्यात उतरताना दिसत आहे. या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राचे सुपुत्र आणि संरक्षण क्षेत्रातील उद्योजक गणेश निबे यांच्या कर्तृत्वाचा विशेष गौरव केला. देशाच्या सुरक्षेसाठी निबे यांनी केलेले कार्य महाराष्ट्र आणि संपूर्ण देशासाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

गणेश निबे यांच्या कार्याचे कौतुक करताना मुख्यमंत्री म्हणाले, ''महाराष्ट्राच्या मातीतील एका युवकाने संरक्षण क्षेत्रात उभे केलेले काम संपूर्ण देशासाठी गौरवास्पद आहे. आपल्याकडे ७० किमी रेंजपासून थेट ४००-५०० किमी रेंजपर्यंत मारा करणारी शस्त्रे उपलब्ध नव्हती. हा मोठा तांत्रिक 'गॅप' भरून काढण्याचे काम गणेश निबे यांनी केले आहे. निबे यांनी १५० किमी आणि ३०० किमी रेंजपर्यंत अचूक मारा करू शकणारी स्वदेशी शस्त्रे तयार करून भारताच्या सामर्थ्यात भर घातली आहे.

## हिंगोली जिल्ह्यात १५० पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली जिल्हा पोलिस दलातील सुमारे १५० पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या शुक्रवारी ता २२ पारदर्शक आणि समुपदेशन पद्धतीने करण्यात आल्या. जिल्हा पोलिस अधीक्षक निलाभ रोहन तसेच अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या उपस्थितीत ही बदली प्रक्रिया पार पडली. या बदली प्रक्रियेने कर्मचाऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे जिल्हा पोलिस दलातील सुमारे ९०० कर्मचाऱ्यांपैकी एकाच पोलिस ठाण्यात मागील पाच वर्षापासून कार्यरत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांच्या हालचाली सुरू होत्या. बदली प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली होती. त्यानुसार बदलीस पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून बदलीसाठी त्यांना हवे असलेल्या तीन पोलिस ठाण्यांचे विकल्प मागविण्यात आले होते. त्यानुसार शुक्रवारी (ता. २२) सकाळी दहा वाजल्यापासून प्रत्यक्ष बदली प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. कर्मचाऱ्यांनी दिलेल्या पर्यायांनुसार संबंधित ठिकाणी जागा रिक्त असल्यास तत्काळ त्या पोलिस ठाण्यात बदली देण्यात आली. यावेळी काही कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक अडचणी देखील प्रशासनाने जाणून घेतल्या. विशेष म्हणजे अडचणीची परिस्थिती असलेल्या काही कर्मचाऱ्यांना त्याच ठिकाणी एका वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णयही घेण्यात आला. त्यामुळे बदली प्रक्रियेत मानवी दृष्टिकोन जपण्यात आल्याची भावना कर्मचाऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

## नीट फेऱ्यात मोटेगावकरांच्या बेकायदेशीर भूखंड घोटाळ्याचा तपास सुरू

लातूर। प्रतिनिधी

'नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकलेले प्रा. शिवराज मोटेगावकर आणि त्यांच्या कुटुंबीयांची एकापाठोपाठ एक गैरकृत्ये आता उघडकीस येत आहेत. मोटेगावकर कुटुंबीयांच्या ताब्यात असलेल्या लातूर को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेटमधील वादग्रस्त भूखंडाबाबत काल, २२ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात महत्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांनी संबंधित भूखंडांच्या लीजमधील अटी आणि शर्तींची संपूर्ण माहिती सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

माहिती अधिकार कार्यकर्ते मल्लिकार्जुन भाईकट्टी हे गेल्या १२ वर्षांपासून म्हणजेच २०१४ पासून या प्रकरणाविरोधात सातत्याने लढा देत आहेत. उत्पादक उद्योगांना चालना देण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या लातूर को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये नियम धाब्यावर बसवून अनेक कोचिंग क्लासेस आणि हॉटेल्सना जागा देण्यात आल्याचा आरोप आहे. या इस्टेटच्या गैरव्यवहारामुळे २७ सप्टेंबर २०१५ रोजी त्यावर प्रशासक नियुक्त करण्यात आला होता, जो २०१७ मध्ये हटवण्यात आला. त्यानंतर २०१७ मध्येच वसमतचे आमदार डॉ. जयप्रकाश मुंदडा यांनी विधानसभेत हा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. तत्कालीन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी यावर चौकशी समितीही नेमली होती, मात्र त्या अहवालावर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर १३ जुलै २०२३ रोजी लातूर महानगरपालिका आयुक्तांनी अनधिकृत बांधकाम पाडण्याचे आदेश दिले होते, परंतु त्यावेळी मोटेगावकर कुटुंबीयांनी वेळ मागून घेतला होता. तक्रारीनुसार, या इस्टेटमधील भूखंड क्रमांक १७, २६, १३ आणि ६५ हे रघुनाथ मोटेगावकर यांच्या नावावर आहेत. या परिसरात पूर्वी प्रसिद्ध असलेली 'जयशंकर दाल मिल' होती, ज्यांच्या मालकीचे ३८, ३९, ४२ आणि ४२ (अ) हे चार भूखंड होते. १९९९ मध्ये ही मिल बंद पडल्यानंतर मालक संजय अग्रवाल आणि इतरांनी ही जागा स्टेट बँक ऑफ हैदराबादकडे गहाण ठेवली होती.

पुढे ही जागा रघुनाथ मोटेगावकर आणि शिवराज मोटेगावकर यांच्या पत्नी मीनल मोटेगावकर यांनी ६ कोटी ५६ लाख रुपयांना विकत घेतली. या व्यवहारातील भूखंड क्रमांक ४२ आणि ४२ (अ) यांची ताबा पावती व पैसे दिल्याचा उल्लेख असला, तरी हे कोट्यवधी रुपये नेमके कसे दिले गेले, याची कोणतीही स्पष्ट नोंद उपलब्ध नाही. तक्रारदार मल्लिकार्जुन भाईकट्टी यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, या प्रकरणात अधिकाऱ्यांनी ३ वर्षांपूर्वीच निकाल दिला आहे, त्यामुळे आता त्याची तात्काळ अंमलबजावणी व्हावी. उत्तर प्रदेश किंवा पुण्यात ज्याप्रमाणे गुन्हेगारांवर आणि माफियांच्या अवैध बांधकामांवर कडक बुलडोझर कारवाई करून धडा शिकवला जातो, तशीच कडक कारवाई लातूरमध्येही व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## वन खात्यामध्ये नोकरीचे आमीष दाखवुन चार लाखाची फसवणूक

### प्रशिक्षणाचे बनावट आदेश देणाऱ्यां दोघांना पकडलं ;स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना (प्रतिनिधी)

तक्रारदार उमेश जाधव रा.खांडवी ता. परतुर जि. जालना यांना दोघांनी वन खात्यामध्ये नोकरीचे आमीष दाखवुन त्यांचेकडुन ४, लक्ष रुपये घेवुन प्रशिक्षणाचे बनावट आदेश दिले होते. फसवणुक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार यांनी पोलीस ठाणे सदर बाजार येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु यांनी गुन्हयातील आरोपींचा शोध घेणे बाबत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आदेश दिले होते. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाचे आधारे गुन्हयातील आरोपी यांचा शोध घेतला असता, गुन्हयातील आरोपी निलेश गोविंदा झाटे वय २९ वर्षे रा. वसाली ता. पातुर जि. आकोला २) राहुल गजानन कदम वय २६ वर्षे रा. जनुना ता. मेहकर जि. बुलडाणा हे नाव्हा चौफुली परिसरात मिळुन आले आहे. दोघांना ताब्यात घेवुन गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता दोघांनी मिळून तक्रारदार उमेश विजयकुमार जाधव यांना १५ लाख रुपयामध्ये वन खात्यामध्ये नोकरी लावण्याचे आमीष दाखवुन त्यांचेकडुन पहिला टप्पा म्हणुन ४,००,०००/- रुपये घेतले व राहुल कदम याने त्याचे मोबाईल मधील पिक्स आर्ट या ॲपलीकेशनच्या आधारे प्रशिक्षणाचे बनावट आदेश तयार करुन निलेश झाटे याचे व्हॉटसॲपवरुन तक्रारदार यांना पाठवुन त्यांचा विश्वास संपादन करुन बनावट आदेश देवुन फसवणुक केली आहे. दोन्ही इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन रोख १,४५,०००/- रुपये व १,४०,०००/- रुपये किंमतीची गुन्हयात वापरलेली पल्सर मोटारसायकल, गुन्हयात वापरलेले २०,०००/-रुपये किंमतीचे दोन मोबाईल असा एकुण ३,०५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.सदरची कारवाई श्री. तेघबीर सिंह संधू पोलीस अधीक्षक, श्री. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकर्णी, उप विभागीय पोलीस अधिकारी जालना, श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. जालना यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. सचीन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, जगदीश बावणे, कैलास खार्ड, दिपक घुगे, रुस्तुम जैवाळ, अक्रूर धांडगे, कैलास चेके, सोपान क्षिरसागर यांनी केली आहे.

## अवैध डिझेल साठ्यावर छापा;१०० लिटर डिझेल जप्त

अंबड( प्रतिनिधी)

अंबड तालुक्यामध्ये अवैध रित्या पेट्रोल आणि डिझेलची साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर प्रशासनाने २३ मे २०२६ रोजी धडक कारवाई केली आहे. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण आणि तालुका पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून एकूण १०० लिटर अवैध डिझेल जप्त केले आहे.

तालुक्यात काही ठिकाणी विनापरवाना व अवैध पद्धतीने इंधनाचा साठा करून त्याची चढ्या दराने विक्री होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे महसूल व पुरवठा विभागाने तातडीने पथके तयार करून आज विविध ठिकाणी अचानक तपासणी मोहीम राबवली.

या ठिकाणी झाली कारवाई व जप्ती: या धडक मोहिमेदरम्यान खालील ठिकाणांवरून अवैध डिझेल साठा जप्त करण्यात आला:

स्वामी समर्थ किराणा दुकान (कानडगाव, ता. अंबड): येथे तपासणी दरम्यान १० लिटर अवैध डिझेल मिळून आले.

अर्जुन झेरॉक्स अँड मल्टि सर्विसेस (चिंचखेड, ता. अंबड): या ठिकाणी छापा टाकून ४० लिटर डिझेल जप्त करण्यात आले.

स्वामी समर्थ नाश्ता सेंटर (शहापूर, ता. अंबड): या हॉटेलवर केलेल्या कारवाईत सर्वाधिक ५० लिटर अवैध डिझेल साठा हस्तगत करण्यात आला. महत्त्वाची नोंद: आजच्या या संपूर्ण कारवाईमध्ये एकूण १०० लिटर अवैध डिझेल जप्त करण्यात आले असून, संबंधितांवर नियमानुसार पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अवैध विक्रेत्यांना प्रशासनाचा इशारा:

अशा प्रकारे विनापरवाना आणि असुरक्षित रित्या पेट्रोल-डिझेलसारख्या ज्वलनशील पदार्थांचा साठा करणे हा गंभीर गुन्हा असून, यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. ''अंबड तालुक्यात अवैध रित्या इंधन साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. आज झालेली कारवाई ही केवळ सुरुवात असून, तालुक्यात ही धडक मोहीम आणि कारवाई यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहील. अशी माहिती विजय चव्हाण तहसीलदार, किरणकुमार खांडेभराड तालुका पुरवठा निरीक्षक अधिकारी, तालुक्यातील नागरिकांनी किंवा व्यापाऱ्यांनी अशा प्रकारच्या अवैध इंधन साठवणुकीपासून दूर राहावे, अन्यथा कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे



दैनिक
राज्य लोकतंत्र
रविवार दि.२४ मे २०२६


# जनावरे चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी गजाआड

## पेठ बीड पोलिसांची मोठी कामगिरी : ३० लाखांची स्कॉर्पिओ जप्त; १९० किमी पाठलाग करून चोरांना केले जेरबंद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागोबा गल्ली भागातून स्कॉर्पिओ गाड्यामधून गोवंश जातीची जनावरे चोरी करणाऱ्या एका सराईत आणि अट्टल चोरांच्या टोळीला पेठ बीड पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत तीन आरोपींना जेरबंद केले असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली सुमारे ३,००,००० (तीन लाख) रुपये किमतीची काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी जप्त केली आहे.

दिनांक ६ मे २०२६ रोजी पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागोबा गल्ली येथून अज्ञात चोरांनी स्कॉर्पिओ वाहनातून गोवंश जातीची जनावरे चोरून नेली होती. याप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १३०/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**४० हून अधिक सीसीटीव्ही आणि १९० किमीचा पाठलाग:**

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. मारुती खेडकर यांनी तातडीने तपास पथक (डी.बी. पथक) नियुक्त करून आरोपींच्या शोधासाठी रवाना केले. तपास पथकाने बीड शहरातील तब्बल ४० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. यामध्ये एक संशयीत काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी दिसून आली, मात्र तिचा क्रमांक स्पष्ट दिसत नव्हता.

पोलिसांनी हार न मानता संशयास्पद गाडीचा माग काढत तब्बल १९० किलोमीटर अंतरावरील टोल नाके आणि रस्त्यांवरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. तपासात धक्कादायक बाब समोर आली की, आरोपींनी पोलिसांना गुंगारा देण्यासाठी प्रवासादरम्यान वारंवार गाडीच्या नंबर प्लेट बदलल्या होत्या. अखेर तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे ही गाडी मालेगावच्या दिशेने गेल्याचे समजताच पोलिसांचे पथक तातडीने मालेगावकडे रवाना झाले.



**सिल्लोडमधून आरोपींना शिताफीने आवळल्या मुसक्या:**

मालेगाव येथून पोलिसांनी संशयास्पद हालचालींवरून शेख इम्रान शेख ईसा (वय ३४, रा. अब्दालशा नगर, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक) याला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि त्याचे इतर साथीदार व स्कॉर्पिओ गाडी सिल्लोड येथे असल्याची माहिती दिली.

पोलीस पथक तात्काळ आरोपीला सोबत घेऊन सिल्लोड येथे पोहोचले. पोलिसांची चाहूल लागताच इतर आरोपी पळून जाण्याच्या तयारीत होते. मात्र, पोलिसांनी सापळा रचून आणि शिताफीने पाठलाग करून आणखी दोघांना स्कॉर्पिओ गाडीसह (क्रमांक एम.एच. ४१ सी. ९७१७) ताब्यात घेतले.

१. शेख इम्रान शेख ईसा (वय ३४ वर्ष, रा. अब्दालशा नगर, सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर, ह.मु. दरेगाव, मालेगाव, जि. नाशिक) २. शेख तय्यब शेख शफीक (वय ४० वर्ष, रा. मोघलपुरा, सिल्लोड) ३. सलमान वहाब सय्यद (रा. बापुनगर, सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर)

**महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतही गुन्हे उघड:**

पोलीस चौकशीत या टोळीने बीडमधून जनावरे चोरल्याची कबुली दिली आहे. प्राथमिक तपासानुसार, या सराईत टोळीने महाराष्ट्रातील इतर अनेक जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारे जनावरे चोरीचे मोठे पान ३ वर

## मलकापूरच्या पोलिस पाटलांवर प्रशासनाची दिशाभूल केल्याचा ठपका; उपविभागीय अधिकाऱ्यांकडून खुलासा सादर करण्याचे आदेश

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे मलकापूर येथील पांदण रस्त्याच्या वादातून आता प्रशासन विरुद्ध पोलिस पाटील असा नवा वाद निर्माण झाला असून, तहसील प्रशासनाची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप संबंधित पोलिस पाटील यांच्यावर करण्यात आला आहे. याबाबत गावातील भगवत रामकिशन गित्ते यांनी उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती.



निवेदना म्हटले होते की, मलकापूर येथील पांदण रस्त्याच्या पाहणीसाठी तहसील प्रशासनाचे पथक गावात आले असताना संबंधित पोलिस पाटील यांनी प्रशासनाला चुकीची माहिती देऊन संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. "ही जागा नसून दुसरीकडे आहे" असे सांगत मोबाईलमधील चुकीचे ठिकाण दाखवून अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यात आल्याची तक्रारी अर्जात करण्यात आला आहे. तसेच गावातील एका गटाची बाजू घेत शेतकरी बांधवांमध्ये वाद निर्माण होईल, असे वातावरण तयार केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मात्र तहसील प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी अधिकृत नकाशे व कागदपत्रांच्या आधारे प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून वस्तुस्थिती तपासली असल्याचे पान ३ वर

## सिंदफणा नदीपात्रात महिलेचा सांगाडा आढळल्याने खळबळ

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील डुब्बा मांजरा गावालगत वाहणाऱ्या सिंदफणा नदीच्या पात्रात एका महिलेचा सांगाडा आढळून आल्याची धक्कादायक घटना दि २३ मे शनिवार रोजी उघडकीस आली आहे.या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,गावातील काही नागरिक नदीकाठी सरपण गोळा करण्यासाठी गेले असता त्यांना झाडाझुडपांमध्ये मानवी सांगाड्यासारखी वस्तू दिसून आली. संशय आल्याने त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता तो मानवी सांगाडा असल्याचे स्पष्ट झाले. ही माहिती गावात



पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली.घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी परिसराची पाहणी करून सांगाडा ताब्यात घेतला. प्राथमिक तपासात सांगाड्यावर काळ्या रंगाचा ब्लाउज आढळून आल्याने तो महिलेचा असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, मृतदेहाला सुमारे तीन ते चार महिने उलटले असावेत,अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. काही दिवसांपासून नदीतील पाण्याची पातळी घटल्याने हा सांगाडा उघडकीस आला असावा, असा अंदाज स्थानिकांकडून व्यक्त केला जात आहे.तसेच हा मृतदेह पाण्याच्या प्रवाहासोबत वाहत आला असावा किंवा झाडाझुडपांमध्ये पान ३ वर

## भुमीपुजन सोहळ्याला ७ महिने झाले; शिवाजी महाराज, डॉ.आंबडेकर पुतळ्यांची उभारणी नाही

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील नवीन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे व जुन्या बसस्थानक परिसरात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभे राहिले पाहिजे म्हणून आमदार प्रकाश सोळंके यांनी विशेष प्रयत्न केल्यानंतर विशेष बाब सबबीखाली शासनाने परवानगी दिली आणि मोठ्या उत्साहात भव्य भुमीपुजन सोहळ्याच्या नावाने १० ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या लवाजम्यासह भुमीपुजन कार्यक्रम झाला होता.विशेष म्हणजे या भुमीपुजन सोहळा माजलगाव नगरपरिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता त्यावेळी उद्घाटक आमदार सोळंके यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी मोठ्या आवेशात भाषणे केली होती याचे व्हिडिओ, वृत्तपत्रातून प्रसिद्ध बातम्या आहेत.पण त्यांच्या त्या आवेशातील भाषणांचा परामर्श घेतला असता त्यांनी केलेली भाषणे केवळ न.प.निवडुकीच्या तोंडावर केलेल्या वल्गना होत्या हे सिद्ध झाले आहे कारण दोन्ही पुतळ्यांचे स्तंभ (फाँऊडेशन )उभारणी करण्या पलीकडे या सात महिन्यात काहिच काम केलेले नाही तर त्यानंतर सुशोभीकरण कुणाचं हा प्रश्न शिव-आंबेडकर अनुयायांसह तमाम नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.



## पीक विमा मंजुरीसाठी शेतकऱ्यांनी एकजूट होऊन आवाज उठवावा – भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील २०२५ सालच्या खरीप पीक विमा योजनेअंतर्गत विमा भरलेल्या तब्बल १ लाख ७७ हजार ३५१ शेतकऱ्यांनी पीक विमा मंजुरीसाठी एकजूट होऊन आपल्या हक्कासाठी लढा उभारण्याची गरज असल्याचे मत शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी व्यक्त केले.



थावरे म्हणाले की, जिल्ह्यातील ९० हजार ४१८ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरवण्यात आला असून, शेतकऱ्यांनी एकूण ५ कोटी २४ लाख ३९ हजार ८२० रुपये इतका प्रीमियम भरला आहे. मात्र, मोठ्या प्रमाणात प्रीमियम भरूनही शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर, दिनांक १ जून रोजी सकाळी १०:०० वाजता केज येथे बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या कार्यालयात शेतकऱ्यांच्या पीक विमा मंजुरीसंदर्भातील मागण्या मांडण्यात येणार आहेत. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पान ३ वर

## शिवसेना माजलगाव विधानसभा समन्वयकपदी धोंडीराम जाधव

### पक्ष संघटना बळकट करण्याची जबाबदारी

माजलगाव । प्रतिनिधी

शिवसेना पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने माजलगाव येथील धोंडीराम मारोती जाधव यांची शिवसेना माजलगाव विधानसभा समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारधारेतून प्रेरित होऊन पक्ष संघटना वाढीसाठी कार्य करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.



शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव संजय मोरे, मराठवाडा संपर्कप्रमुख ना. प्रकाश आबिटकर, मराठवाडा विभागीय पान ३ वर

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या १४ गोवंशाची गेवराई पोलिसांकडून सुटका; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात अवैध गोवंश कत्तली रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. साठेनगर, गेवराई येथे कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत निर्दयतेने डांबून ठेवलेल्या १४ लहान-मोठ्या गोवंश जातीच्या जनावरांची गेवराई पोलिसांनी शनिवारी (दि. २३) सकाळी छापा टाकून सुटका केली. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी आगामी सणाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील अवैध गोवंश कत्तलीबाबत माहिती काढून कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना गोपनीय माहिती मिळाली की, साठेनगर गेवराई येथील सलमान मोहंमद कुरेशी (वय २५ वर्षे, रा. साठेनगर, गेवराई) याने आपल्या ताब्यातील जागेत कत्तल करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या गोवंश जातीची जनावरे डांबून ठेवली आहेत. या खात्रीशीर माहितीच्या आधारे गेवराई पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने २३ मे २०२६ रोजी सकाळी ८:०० वाजण्याच्या सुमारास साठेनगर येथील संशयित जागेवर छापा टाकला. या छाप्यात आरोपी सलमान कुरेशी याच्या मालकीच्या जागेत लहान-मोठी १४ गोवंश जातीची जनावरे चारा-पाण्याची कोणतीही सोय न करता, अतिशय दाटीवाटीने डांबून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्परता दाखवत अंदाजे १,६०,५००/- रुपये किमतीच्या या १४ जनावरांची सुटका केली. या सर्व जनावरांना पुढील संगोपन पान ३ वर



## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीची दमदार वाटचाल यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत १५ विद्यार्थी पात्र

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाची शाळा फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी भाटवडगाव च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. इयत्ता ५ वी व ८ वीच्या या परीक्षेत शाळेतील २८ विद्यार्थी बसले होते त्या पैकी १५ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीस पात्र* ठरले आहेत.

शाळेच्या या यशामुळे माजलगाव शहरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक,प्राचार्या सारिका बजाज, संचालक अण्णासाहेब तौर,प्रभाकर शेटे, व इम्रान नाईक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी उपमुख्याध्यापक सचिन गायकवाड, उप मुख्याध्यापक स्वाती बनसोडे,ऐश्वर्या चांडक,रमेश बाहेती यांच्यासह शाळेतील संपूर्ण शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या परीक्षेची तयारी सहशिक्षिका अंकिता तर्कसबंद व मनीषा डाके यांनी केली त्यांच्या मेहनतीचे फलित म्हणून हे विद्यार्थी चमकले.



शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले विद्यार्थी

सत्यजित सचिन पवार,युवराज संदीप चव्हाण, उदयन शरद झुटे, वरद अमोल फपाळ,तनिष्का बालाप्रसाद नाटकर,दीपांजली व्यंकटेश वादाडे, ओम संदीप कुलकर्णी,अश्लेषा बाबुराव खोदाणपुरे, राजवीर महेशराव मगर,स्वरा सतीश बुरंगे,अर्णव संजय निकम,अथर्व रमेश बाहेती,नैतिक मुरकुटे,देवदत्त सरवदे,कार्तिक शिंदे.

फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीच्या या यशाने पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला आहे. शाळा प्रशासनाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## जनता होरपळली, सरकार झोपेत; राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीडमध्ये 'झोप आंदोलन'

### वाढत्या महागाईविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारला जागे करण्याचा प्रयत्न

बीड/आष्टी । प्रतिनिधी

वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्याने सर्वसामान्य नागरिकांचे जगणे असह्य झाले असताना राज्य आणि केंद्र सरकार मात्र सत्तेच्या राजकारणात मश्गूल असल्याचा घणाघात करत राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवारी दि. २१ मे रोजी अनोखे आणि तीव्र आंदोलन करण्यात आले.

'जनता त्रस्त, सरकार मस्त' अशी घोषणा देत युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चक्क रस्त्यावर झोपून 'प्रतीकात्मक झोप आंदोलन' केले. वाढत्या महागाईने होरपळणाऱ्या जनतेच्या वेदना सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

देशभरात पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर तसेच अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असताना केंद्र सरकारला सामान्य माणसाच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे राहिले नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. जनतेचे संसार उद्ध्वस्त होत असताना सरकार निवडणुकांच्या प्रचारसभांमध्ये व्यस्त होते. पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि आसाममधील निवडणुकांमध्ये मश्गूल असलेल्या सत्ताधाऱ्यांनी देशाच्या अर्थकारणाकडे आणि जनतेच्या वेदनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, असा संतप्त सूर निवेदनातून उमटला.



हे सरकार जनतेच्या प्रश्नांवर अक्षरशः झोपले आहे. बेरोजगारी, महागाई आणि इंधन दरवाढीमुळे नागरिक मेटाकुटीला आले असताना सरकारला मात्र जनतेच्या अश्रूंशी काहीही देणेघेणे उरलेले नाही, अशा कडक शब्दांत शासनाचा निषेध करण्यात आला.

आंदोलकांनी शासनाला इशारा देत म्हटले की, आता तरी सरकारने झोपेतून जागे होऊन महागाई नियंत्रणात आणण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. पेट्रोल-डिझेल, गॅस तसेच जीवनावश्यक वस्तूंचे दर तातडीने कमी करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अन्यथा जनतेचा संताप आणखी तीव्र होईल.

यावेळी राहुल काकडे, अविनाश सानप, दीपक हजारे, विनोद पवार, राम येवले, कुलदीप पवार यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अतिवृष्टीची भरपाई, पीक विमा आणि कर्जमाफीच्या प्रश्नावर किसान सभेचे आ.सोळंकेना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव,धारूर आणि वडवणी तालुक्यात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केल्याप्रमाणे पीक विम्यातून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७,५०० रुपये भरपाई मिळावी, सुधारित पीक विमा योजना रद्द व्हावी आणि प्रलंबित कर्जमाफीचा लाभ मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना एक विस्तृत निवेदन देण्यात आले.

**जमिनी वाहून गेल्या; हजारो शेतकरी मदतीपासून वंचित**

निवेदनात नमूद केल्यानुसार, गेल्या वर्षी १५ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील उभी पिके तर उद्ध्वस्त झालीच, शिवाय शेतीची सुपीक मातीही मोठ्या प्रमाणात वाहून गेली. या नुकसानीनंतर सरकारने एन.डी.आर.एफ. निकषांनुसार प्रति हेक्टर ८,५०० रुपये आणि रब्बी पेरणीसाठी प्रति हेक्टर १०,००० रुपये (३ हेक्टरच्या मर्यादेत) मदत जाहीर केली होती. तसेच पीक विमाधारकांना किमान १७,५०० रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली होती. मात्र, प्रत्यक्षात आज घडीला तिन्ही तालुक्यांतील शेतकरी या पिक विम्यापासून पूर्णपणे वंचित आहेत.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आळंदीत माऊलींच्या दानपेटीवर डल्ला, विश्वासू सेवेकऱ्याच्या घरी पावणे चार लाखांची रोकड सापडली

पिंपरी । प्रतिनिधी

देवाच्या आळंदीतील माऊलींच्या दानपेटीवर सेवेकऱ्याने डल्ला मारला. त्या विशाल वारुळे नामक सेवेकऱ्याच्या घरात रोकड सापडली आहे. १०, २०, ५० आणि शंभर रुपयांच्या नोटांनी भरलेल्या पिशव्यांमध्ये तब्बल पावणे चार लाख रुपये जप्त करण्यात आलेत. दानपेटीतील रक्कम जमा करताना विशाल हातचलाखी करायचा आणि एका पिशवीमध्ये नोटा भरायचा. गेल्या तीन महिन्यांपासून त्याचा हा उद्योग सुरु होता, असा अंदाज वर्तवला जातोय. ज्या दिवशी नोटांनी भरलेली पिशवी घरी घेऊन जायचा, त्या दिवशी विशाल मंदिरातील काही हार घरी घेऊन जातो. असं म्हणायचा आणि पिशवीत हार दिसतील असे ठेवायचा, खाली मात्र रोकड असायची. घरी आल्यावर रोकड मोजायचा आणि नंतर ती पिशवी आहे तशी बेडमध्ये ठेऊन द्यायचा. त्याचं पिशव्यांमध्ये पावणे तीन लाखांची ही रोकड आढळली. गेल्या तीन महिन्यांपासून तो दानपेटीतील रक्कम जमा करणे आणि ती मोजून ठेवणे, हे काम करत होता.

विशाल वर्षभरापूर्वी मंदिरात आला, तिथं भोजनालायतील आचाऱ्याला भेटला. मी जुन्नर तालुक्यातील वारुळेवाडी गावातून आलोय, माझा केटरिंगचा व्यवसाय आहे. मला माऊलींची सेवा करायची आहे, मला अन्नदान छत्रातून सेवा करण्याची संधी द्या. असं म्हणून त्याने सर्वप्रथम आचाऱ्याला विश्वासात घेतलं. इथं तो भाविक-भक्तांना सेवा द्यायला लागला. पाच-सहा दिवस तो इथं काम करायचा आणि मध्येचं गायब व्हायचा. परत काही दिवसांनी यायचा आणि मंदिरात सेवा द्यायचा. ही सेवा देता-देता त्याने इतर सेवेकारांच्या मदतीने मंदिरातील अनेकांशी ओळख निर्माण केली. पाच-सहा महिन्यांपूर्वी त्याने मंदिरातील कॅशियरशी जवळीक वाढवायला सुरुवात केली. कॅशियरची कामं ऐकू लागला. स्वतः किती प्रामाणिक आहे, हे दिसेल अशी कृती करु लागला. कॅशियरची इतर कामं हलकी होऊ लागली. अशा रीतीने हळूहळू कॅशियरच्या मनात स्वतःबद्दल विश्वास निर्माण करण्यात तो यशस्वी ठरला. मग तीन महिन्यांपूर्वी



कॅशियरने त्याला दानपेटीतील रक्कम जमा करण्याच्या कामात दाखल करुन घेतलं. अलीकडच्या काही दिवसांपासून कॅशियर, सुरक्षारक्षक आणि सेवेकरी म्हणून विशाल असे तिघेचं दानपेटी खोलायचे.

अनेक दानपेट्या असल्यानं प्रत्येकावर वेगवेगळ्या दानपेट्या खोलण्याची आणि रक्कम जमा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. विशालला जे अपेक्षित होतं, ते घडू लागलं. मग गेल्या वर्षभरात विशालने जो विश्वास निर्माण केला होता, त्याचा गैरफायदा घ्यायला त्याने सुरुवात केली. दानपेटी खोलली की बादलीत रक्कम भरता-भरता तो काही रक्कम त्याने आणलेल्या पिशवीत भरु लागला. कॅशियरकडे बादली सोपवणे आणि सर्व रक्कम जमा करुन होईपर्यंत तो पिशवीत भरलेली रक्कम घरी घेऊन जायचं नियोजन करायचा. यासाठी मंदिरातील काही हार घरी घेऊन जातो, असा बहाणा तो करायचा. ते हार पिशवीत दिसतील असे ठेवायचा, खाली मात्र रोकड असायची. ही हातचलाखी तो गेल्या काही दिवसांपासून करत राहिला. तीन-चार दिवसांपूर्वी मात्र सीसीटीव्हीच्या स्क्रिनसमोर बसलेल्या कर्मचाऱ्याला त्याच्या हालचालींवरील संशय आला. मग त्याने दोन दिवस निरखून पाहिले, ही बाब देवस्थानच्या कानावर घातली. देवस्थानने पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी तपासाची चक्र हलवली आणि विशालचे बिंग फुटले. आजवर त्याने ज्या पिशव्यांमध्ये रक्कम चोरुन नेहली, त्या सर्व पिशव्या रोकडसह जप्त करण्यात आल्या. ती रोकड मोजली असता पावणे चार लाख रुपये आढळले आहेत. बरीचं रक्कम त्याने खर्च ही केलीये, काही ठिकामी रक्कम गुंतवल्याची चर्चा ही सुरुये. जुन्नर तालुक्यात त्याने असे काही उद्योग केल्याचं बोललं जातंय. या सर्व अनुषंगाने आळंदी पोलिसांनी तपासाची चक्र हलवली आहेत. विशालने हे एकट्यानं केलंय की मंदिरातील आणखी कोणाचं त्याला पाठबळ होतं? याचा तपास करण्याची ही गरज आहे. कारण याआधी ही माऊलींच्या चरणी अर्पण झालेल्या रकमेवर डल्ला मारण्यात आल्याचं निदर्शनास आलेलं आहे. मात्र बदनामी होऊ नये म्हणून देवस्थानकडून अशा घटनांवर पडदा टाकण्याचं काम होत आलंय, अशी चर्चा नेहमीचं होते. यानिमित्ताने देवस्थानच्या कार्यपद्धतीवर प्रश्न ही उपस्थित होत आलेत. वेळोवेळी घडणारी ही चुकीची चर्चा थांबवायची असेल तर देवस्थानने याप्रकरणाच्या निमित्ताने इतर बाबींवर प्रकाश टाकायला हवा. शेवटी भाविक-भक्तांच्या श्रद्धेशी खेळण्याचा अधिकार माऊलींनी कोणालाचं दिला नाही, हे कोणी विसरता कामा नये.

# ऐऱ्या-गैऱ्याला महत्त्व देत नाही; वळसेंची मोहिते यांच्यावर टीका

राजगुरुनगर । प्रतिनिधी

कोण बोलते यालाही किंमत असते, ऐऱ्या-गैऱ्याला मी महत्त्व देत नाही, अशी टीका माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी स्वपक्षीय खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्यावर केली आहे. 'भीमाशंकर:खेड-आंबेगाव' या प्रकरणावरून मोहिते पाटील यांनी वळसे पाटील आणि खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्यावर केलेल्या टीकेला वळसे यांनी उत्तर दिले.



आ. बाबाजी काळे यांचे बंधू ड. विलास रामचंद्र काळे यांचे नुकतेच निधन झाले. या परिवाराला भेट देण्यासाठी शुक्रवारी (दि २२) वळसे पाटील पाडळी येथील काळे यांच्या निवासस्थानी आले होते. यावेळी बोलताना त्यांनी मोहिते पाटील यांचा नामोल्लेख टाळून टीका केली. आ. बाबाजी काळे, ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टे पाटील, जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, कात्रज दूध संघाचे माजी अध्यक्ष विष्णू हिंगे, बाजार समिती संचालक हनुमंत कड, दत्ता सातपुते व इतर यावेळी उपस्थित होते.

वळसे म्हणाले, क्षमता नसलेल्या लोकांनी रडगाणे सुरू ठेवले आहे. मी आठ वेळा आमदार झालो. त्यांनी स्वतःला तपासून पाहावे. मी विकासकामात राजकारण करीत नाही. चासकमान धरणाच्या परिसरातील कळमोडी प्रकल्प रखडलेला आहे. आमदार बाबाजी काळे आणि आपण त्यावर काम करत आहोत. रद्द झालेल्या पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाबाबत आपण काही बोलू शकत नाही, याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना माहिती विचारा, असे पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर वळसे पाटील यांनी स्पष्ट केले, ते म्हणाले, मंत्री, आमदार असलो तरी खेड तालुक्यातील राजकीय, सामाजिक वर्तुळात कोणत्याही प्रकारचे अधिकार गाजवले नाहीत. भीमाशंकर देवस्थानच्या विकासावरून वाद निर्माण होत असतील तर मंदिर आणि विकास आराखड्याला खेडचेच नाव राहू द्या.

# युवकांना झुरळ म्हणणे म्हणजे युवाशक्तीचा अपमान, गैरसमज पसरवत 'कॉक्रोच पार्टी'वर बंदी; विश्वजीत कदम यांचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

युवकांसारख्या समाजातील महत्त्वाच्या घटकाला झुरळ म्हणणे युवाशक्तीचा अपमान आहे. वाढत्या बेरोजगारीसह त्यांच्या अन्य समस्यांवर मीठ चोळले जात आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी' ला मिळणारा मोठा प्रतिसाद पाहून ते देशाबाहेरचे आहेत, असा गैरसमज पसरवत त्यांच्यावर बंदी आणली गेली,' असा आरोप माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी केला आहे. कॉक्रोच जनता पार्टी ही तूर्त समाज माध्यमांवरून चालणारी चळवळ आहे,' असेही कदम म्हणाले.



पुणे शहर आणि जिल्ह्यासह राज्यात गुन्हेगारी घटना वाढत आहे. महिलांवरील अत्याचार थांबत नाहीत. लहान मुलींवर अत्याचार होत आहेत. याला गृहमंत्री असलेले मुख्यमंत्रीच जबाबदार आहेत. राज्यात कायदा सुव्यवस्था राखणे ही त्यांची जबाबदारी आहे. किती गुन्हे जलदगती न्यायालयात चालवले गेले, किती गुन्ह्यांबाबत जलदगती न्यायालयाची फक्त घोषणाच झाली, त्यातील किती घटनांमध्ये अद्याप न्याय मिळालेला नाही, हे सर्वांसमोर आहे. त्यामुळे राज्य सरकार झोपले आहे की जागे आहे, हेच समजत नाही, अशी टीकाही डॉ. कदम यांनी पत्रकार परिषदेत केली .राज्यात विविध समस्यांचे डोंगर उभे आहेत. महागाई, रस्त्यांची दुरावस्था, पाणीटंचाई, बेरोजगारी, कंत्राटदारांची थकलेली देणी, शेतकऱ्यांच्या समस्या याकडे दुर्लक्ष करत राज्य सरकार केवळ राजकारणच करत आहे, असेही कदम म्हणाले. 'आखाती देशांमधील युद्धस्थितीमुळे पेट्रोल डिझेलवर परिणाम होणार आहे, याची सरकारला कल्पना होती. मात्र, त्याकडे लक्ष न देता भाजपचे केंद्र सरकार केवळ पाच राज्यातील निवडणुकांमध्येच मग्न होते. मधील काळात कोणत्याही उपाययोजना न करताच या सरकारने निवडणुकांचे मतदान झाल्याच्या ४८ तासातच इंधनाचे दर वाढवले. त्यामुळे आधीच महागाईने होरपळलेल्या जनतेच्या अडचणीत भरच पडली आहे, असेही कदम म्हणाले. युवकांचा काँग्रेसलाच पाठिंबा आहे. काँग्रेस ही समाज माध्यमांवरून नव्हे तर रस्त्यावर उतरून काम करणारी संघटना आहे. काँग्रेसने कायमच संपूर्ण समाजाच्या विविध प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढा दिला आहे. सभागृहात जनतेचे प्रश्न मांडले आहेत. त्यामुळे युवकही काँग्रेससोबतच आहेत. सध्या जिथे काँग्रेसची स्वत:ची सत्ता आहे, तिथे तसेच जिथे काँग्रेस मित्रपक्षांसह सत्तेत आहे, तिथे काँग्रेसने ४५ वर्षांच्या आतील युवा पदाधिकाऱ्यांनाच कॅबिनेट मंत्रीपद दिले आहे. कॉक्रोच जनता पार्टी ही तूर्त समाजमाध्यमांवरून चालणारी चळवळ आहे,' असेही कदम म्हणाले.

# मनीषा हवालदारने पैसे घेऊन प्रश्न विकले, प्रश्नपत्रिकेच्या नोट्सही जाळल्या; CBI तपासातून धक्कादायक माहिती

पुणे । प्रतिनिधी

नीट पेपरफुटीप्रकरणाचे पुणे कनेक्शन अधिक गडद झाले असून नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयकडून आता पुण्यातील आणखी एका महिलेची कसून चौकशी करण्यात येत आहे. प्रश्न पुरविण्याचा बदल्यात मनीषा हवालदारने रोख रक्कम स्वीकारल्याचे सीबीआय (उइख) तपासात उघड झालं आहे. मनीषा हवालदारने नीट संबंधित प्रश्नांच्या हस्तलिखित नोंदी तयार करून स्वतःकडे ठेवल्या होत्या. संबंधित प्रश्न व्हॉट्सअँप आणि प्रिंटआउट काढून दिले, त्याबदल्यात रोख रक्कम स्वीकारल्याची माहिती आहे. याप्रकरणी, मनिषा हवालदारला २५ तारखेला सीबीआयकडून दिल्ली न्यायालयात हजर केले जाण्याची शक्यता आहे.



सीबीआयने मनीषा हवालदारला पुण्याच्या विशेष न्यायालयात रात्री १२ वाजता हजर केलं आणि ट्रान्झिट रिमांड घेतली. एनटीएकडून मनीषा हवालदार नीट परीक्षेच्या भौतिकशास्त्र विषयाच्या अधिकृत अनुवादक म्हणून कार्यरत होत्या. मात्र, आर्थिक मोबदल्यासाठी मनिषा मांढरेशी संगनमत करून काही विद्यार्थ्यांना त्यांनी प्रश्न पुरवले, अशी सूत्रांची माहिती आहे. भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नमंजुषा असलेल्या नोट्स आरोपी हवालदार यांनी जाळून नष्ट केल्याची धक्कादायक माहिती सीबीआयच्या तपासातून समोर आली आहे. तपास यंत्रणांना संशय येऊ नये किंवा हाती काही लागू नये म्हणून ह्या नोट्स जाळून टाकण्यात आल्या आहेत. हवालदारने मनीषा मांढरेसोबत केलेले चॅटिंग सुद्धा डिलिट करण्यात आले. मनिषा हवालदार आणि मनिषा मांढरेमध्ये व्हॉट्सप चॅट झाले होते, त्याचे मेसेज डिलिट करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, हवालदारने पतीच्या फोनवरून सुद्धा मनिषा मांढरेला प्रश्नमालिका पाठवल्याची धक्कादायक माहिती सीबीआय तपासातून पुढे आली आहे.

मनीषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी

नीट पेपरफुटीप्रकरणी मनीषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. याचदरम्यान, मनीषा मांढरेबाबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मनीषा मांढरेच्या तपासात तांत्रिक अडचणी येत आहेत. मनीषा मांढरेची स्वत:ची स्मरणशक्ती चांगली होती. त्यामुळे याच स्मरणशक्तीचा मनीषा मांढरेने उपयोग केला. मनीषा मांढरेला सर्व प्रश्न तोंडपाठ होते. मनीषा मांढरेने कोणताही पुरावा मागे सोडलेला नाही. मनीषा मांढरेनेच्या या ट्रिकने सीबीआयही चक्रावली. दरम्यान, नीट पेपरफुटीतील अन्य आरोपी मनीषा वाघमारे हिने चौकशीत मनीषा मांढरेचं नाव घेतलं आहे. त्यानंतर सीबीआयने मनीषा मांढरेला अटक केली होती. मनीषा मांढरेविरोधात अन्य कोणताही ठोस पुरावा मिळाला नव्हता.

# विधानपरिषदेसाठी दीपक मानकर यांनी ठोकला शड्डू; भाजपकडे केली 'ही' आग्रही मागणी

पुणे । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक जाहीर केल्याने राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापू लागले आहे. या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी आणि जोरदार तयारी सुरू केली आहे. अशातच, पुणे स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी निवडणूक लढवण्याची जाहीर इच्छा व्यक्त केली आहे. तसेच महायुतीमध्ये ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळावी, अशी आग्रही मागणी त्यांनी भाजपकडे केली आहे.



पुणे शहर आणि जिल्ह्यात महापालिका, नगरपालिका आणि पंचायत समिती अशा एकूण २३ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. या संस्थांमधील विद्यमान नगरसेवक आणि सदस्यांचे पक्षीय संख्याबळ पाहता राष्ट्रवादी काँग्रेसचे पारडे जड असल्याचे दिसते. पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वाधिक (३४४) नगरसेवक आणि लोकप्रतिनिधी असल्याने संख्याबळाच्या जोरावर ही जागा नैसर्गिकरीत्या राष्ट्रवादी काँग्रेसचीच ठरते, असा दावा मानकर यांनी केला आहे. आपली उमेदवारी आणि हक्काबाबत अधिक स्पष्टीकरण देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष दीपक मानकर म्हणाले, मी निश्चितपणे या विधान परिषद निवडणुकीसाठी पूर्णपणे इच्छुक आहे. ही जागा मूळची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीच आहे. आम्ही नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीचे धर्म पाळत अत्यंत प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यामुळे आता भाजपने ही जागा मित्रपक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडायला हवी. या संदर्भात मी पक्षाच्या नेत्या आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच पार्थ पवार यांची भेट घेऊन उमेदवारीची अधिकृत मागणी केली आहे. पक्षात अनेक जण इच्छुक असले, तरी गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाची संघटनात्मक बांधणी आणि पक्षासाठी केलेले ग्राउंड वर्क पाहता पक्षाने मला संधी द्यावी. या निवडणुकीत भाजपने ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडणे, हीच खरी दादांसाठी श्रद्धांजली ठरेल.

# दक्षिण पुण्यात वारंवार वीज खंडित, नागरिक संतप्त; महावितरणविरोधात रोष

पुणे । प्रतिनिधी


दक्षिण पुण्यातील कात्रज, सुखसागर नगर, आंबेगाव, दत्तनगर, संतोषनगर, अंजनीनगर तसेच नव्याने समाविष्ट गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांसह व्यावसायिक हैराण झाले आहेत. भर उन्हाळ्यात तासन् तास वीज गायब राहत असल्याने महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कोणतीही पूर्वसूचना न देता दिवसातून अनेकदा वीजपुरवठा बंद केला जात आहे. सुखसागरनगर परिसरात मागील दोन दिवस रात्री तब्बल सात ते आठ तास वीजपुरवठा खंडित राहिल्याने नागरिकांना उकाड्यात रात्र काढावी लागली. वीज नसल्यामुळे सोसायट्यांतील पाण्याचे पंप बंद पडून पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडले आहे. महावितरणकडून बुधवारी रात्री ब्रेकडाऊन झाल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याचे सांगण्यात आले. धानोरी आणि लोहगाव परिसरात वाढत्या लोकसंख्येमुळे वीजपुरवठा यंत्रणेवर ताण वाढला असून, वारंवार भारनियमनाचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून बोपखेल व्हीएसएनएल एसटीएन ते पोरवाल एसटीएन आणि बोपखेल व्हीएसएनएल एसटीएन ते संतनगर एसटीएन, लोहगाव या दोन डबल रन इन्कमर केबल टाकण्याच्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. काही दिवसांपूर्वी धानोरी परिसरात इन्कमर लाईनमध्ये बिघाड झाल्याने जवळपास पाच तास वीजपुरवठा खंडित झाला होता. पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

# सिंहगड किल्ल्यावरून खाली येताना दुचाकी दरीत ; तरुण-तरुणी जखमी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात सिंहगड घाटात एक भयंकर घटना घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. दुचाकी दरीत कोसळून भीषण अपघात झाला.या अपघातात एक तरुण आणि तरूणी गंभीर जखमी झाली.पूजा चव्हाण आणि सौरव पासलकर अशी जखमी झालेल्या दोन पर्यटकांची नावं आहेत.सिंहगड किल्ल्याच्या घाट रस्त्यावरील ११ हजार पॉईंट परिसरातून दुचाकी थेट खोल दरीत कोसळल्याने हा अपघात झाला.सिंहगड किल्ल्यावरून खाली येताना चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्दैवी घटना घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, सिंहगड घाटातून तरुण-तरुणी दुचाकीवरून प्रवास करत होते.त्यावेळी चालकाचं दुचाकीवरील नियंत्रण सुटलं आणि दुचाकी थेट दरीत कोसळली. सिंहगड किल्ल्याच्या घाट रस्त्यावरील ११ हजार पॉईंट परिसरातून दुचाकी थेट खोल दरीत पडली.या अपघाताची माहिती मिळताचं.वनविभाग,वन समितीचे कर्मचारी,स्थानिक नागरिक, पर्यटक आणि आपत्ती व्यवस्थापन पथक तातडीनं घटनास्थळी दाखल झाले. या पथकाच्या अथक प्रयत्नानंतर जखमींना दरीतून सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.या अपघातात पूजा चव्हाणच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. पायाच्या इतर भागालाही फ्रॅक्चर झाल्याची माहिती समोर आलीय.तर तरुण सौरव पासलकर याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

# वडगाव मावळ येथे इंद्रायणी भात बियाण्याचे वितरण केंद्र सुरू; शेतकऱ्यांसाठी उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध

वडगाव मावळ

तालुक्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार आणि अधिक उत्पादनक्षम इंद्रायणी भात बियाणे सहज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने मावळ ॲग्रोच्या वतीने वडगाव मावळ येथे इंद्रायणी भात बियाण्याचे वितरण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना थेट आणि प्रमाणित बियाणे मिळण्याचा मार्ग खुला झाला असून शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

वडगाव मावळ येथील राजमुद्रा फूड जंक्शन परिसरात जिल्हा बँकेच्या संचालकांच्या उपस्थितीत या वितरण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. आमदार सुनील शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहकार महर्षी माऊली दाभाडे आणि तुकाराम ढोरे यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी



जिल्हा परिषद सदस्या पल्लवी दाभाडे, सहाय्यक निबंधक नवनाथ अलमट, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विलास मालपोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मावळ ॲग्रोमार्फत शेतकऱ्यांसाठी इंद्रायणी भाताचे दोन प्रकारचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यात 'ब्रीडर बियाणे' (मूळ बियाणे) आणि 'प्रमाणित बियाणे' या दोन प्रकारांचा समावेश आहे. अधिक उत्पादन क्षमता, उत्तम दर्जा आणि रोगप्रतिकारक क्षमता ही या बियाण्यांची वैशिष्ट्ये असल्याचे आयोजकांनी सांगितले. शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे आणि विश्वासार्ह बियाणे मिळावे यासाठी मागील काही वर्षांपासून सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. यासोबतच शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळवून देण्यासाठी मावळ ॲग्रोने विशेष प्रयत्न केले आहेत. यापूर्वी व्यापाऱ्यांकडून भाताला प्रतिकिलो १६ ते १८ रुपये दर मिळत होता. मात्र मावळ ॲग्रोच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पहिल्या वर्षी २६ रुपये, दुसऱ्या वर्षी २८ रुपये, तिसऱ्या वर्षी ३२ रुपये आणि चौथ्या वर्षी ३४ ते ३६ रुपये प्रतिकिलो असा दर मिळवून देण्यात आल्याचा दावा करण्यात आला. तसेच ब्रँडिंगद्वारे विक्री झालेल्या भाताला ४० रुपये प्रतिकिलोपर्यंत दर मिळाल्याचे सांगण्यात आले. आगामी हंगामात याहून अधिक चांगला दर मिळवून देण्याचा मानसही संस्थेकडून व्यक्त करण्यात आला.या वितरण केंद्रामुळे मावळातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, योग्य मार्गदर्शन आणि चांगला बाजारभाव मिळण्यास मदत होणार असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# भोर तालुक्याला मान्सूनपूर्व पावसाचा तडाखा; दुचाकीवरून जाताना वीज कोसळली, तरुण जागीच ठार

भोर । प्रतिनिधी

भोर शहर आणि तालुक्याच्या विविध भागात शुक्रवार (दि.२२) दुपारी वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. या नैसर्गिक आपत्तीत अंगावर वीज पडल्याने एका २२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

सकाळपासूनच तालुक्यात प्रचंड उष्मा आणि ढगाळ वातावरण होते. दुपारी अडीचच्या सुमारास अचानक सुसाट्याचा वारा आणि गारांच्या वर्षावासह पावसाला सुरुवात झाली. सुमारे दीड तास चाललेल्या या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला



असला, तरी अनेक ठिकाणी नुकसानीच्या घटना घडल्या अचानक आलेल्या पावसामुळे उन्हाळी पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. पूर्व भागातील पिकांना या पावसाचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

वादळामुळे शहरासह ग्रामीण भागातील अनेक भागांत वीज पुरवठा विस्कळीत झाला होता. शहरात सखल भागात पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. मान्सूनपूर्व पावसाचा अंदाज पाहता नागरिकांनी विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी तीनच्या सुमारास उत्रौली कानवडीच्या हद्दीतील परीटमाळ येथे ही दुर्घटना घडली. दुचाकीवरून प्रवास करत असताना अचानक वीज कोसळल्याने शंकर किसन काटेकर (वय २२ रा. वडगाव डाळ ता. भोर) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर चंद्रकांत गणपत वाघमारे (वय २६) अनिल रवी घोगरेकर (वय २३ दोघे रा. वडगाव डाळ ता.भोर) सागर शांताराम पवार (वय २५) हे तरुण जखमी झाले आहेत. जखमींवर भोर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, भोर पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.